| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३०१ वा | मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा


### देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत स्पष्ट केली भूमिका!

**मुंबई/प्रतिनिधी :** देशात 'डिजिटल अरेस्ट'च्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. मोठ्या संख्येने लोक याला बळी पडत असून त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होत आहे. या घटना टाळण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली पाहिजेत, तसेच जनजागृतीची व्याप्ती वाढवली पाहिजे अशी मागणी मंगळवार आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत केली. त्यांच्या या प्रश्नावर राज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिलं असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत सखोल माहिती दिली.

मुंबई आणि अहिल्यानगरसारख्या शहरातील नागरिक डिजिटल अरेस्टला बळी पडत आहेत. त्यांची आयुष्याची जमापुंजी अशा लुटारूंच्या हाती द्यावी लागत आहे. या सायबर आरोपींविरोधात कारवाई करावी करावी आणि जनजागृती करावी, असं अबू आझमी आज सभागृहात म्हणाले. त्यावर, केंद्र आणि राज्य सरकारकडून जनजागृती मोठ्या प्रमाणात सुरू असून सायबर फसवणुकीला बळी पडल्यानंतर तत्काळ तक्रार केल्यास तक्रारीचं निवारण करता येतं आणि जास्तीत जास्त पैसे रिकव्हर करता येतात, असे राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले.



मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र गंगाधरराव फडणवीस




**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

तसेच, या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भाष्य केले. ते म्हणाले, राज्यमंत्र्यांनी योग्य उत्तर दिले आहे. या सभागृहातील चर्चा राज्यभरात जातेय म्हणून मी ही संधी घेतो. या माध्यमातून या सभागृहातील सदस्यांना आणि राज्यतील नागरिकांना सांगतो की डिजिटल अरेस्ट असा प्रकारच नाहीय. कायद्याने कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. त्यामुळे तुम्हाला कोणी डिजिटल अरेस्टचा फोन केला किंवा व्हिडिओ कॉल केला तर पहिल्याच क्षणी समजून घ्या की हा फ्रॉड आहे. १०० टक्के हा फ्रॉड आहे.

**डिजिटल अरेस्ट करताच येत नाही**

कोणत्याही कायद्यान्वये कोणीही कोणाला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. तुम्हाला एक फोन येतो, व्हिडिओ कॉल येतो, त्यावर समोर बसलेला माणूस स्वतःला सीबीआयचा, पोलिसांचा अधिकारी सांगतो. मग तिथून तो म्हणतो की तुम्ही पार्सल मागवले होते का? त्यात ड्रग्स सापडले आहेत. तुम्हाला जागचं हलण्यासही परवानगी दिली जात नाही. तुम्हाला स्क्रीनपुढेच राहायला सांगितलं जाते. त्यातून सुटण्याकरता तुम्हाला पैसे पाठवण्याची मागणी केली जाते. मग सामान्य माणूस घाबरून पैसे ट्रान्स्फर करतो, अशी प्रक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी डिजिटल अरेस्टची सांगितली.

डिजिटल अरेस्ट प्रकरणात फक्त सामान्य माणूस नाहीतर अनेक मोठे अधिकाही, निवृत्त अधिकारीही अडकले जातात, असंही फडणवीस म्हणाले. पीडितांनी पैसे पाठवले की ते पैसे वेगवेगळ्या खात्यांमध्ये तत्काळ ट्रान्सफर केले जातात, मग ते विदेशातील खात्यांतही पाठवले जातात. अनेक प्रकरणात असे लक्षात आलंय की पूर्ण ऑपरेशन विदेशातून होतं, असंही ते म्हणाले.

**गोल्डन अवरमध्ये तक्रार दाखल करा**

कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. जर तुम्हाला असा फोन आला तर थेट त्याच क्षणी १९३० या नंबरवर कॉल करा. हा सायबरचा नंबर आहे. मोठी व्यवस्था उभी आहे. तुम्हाला असा फोन आला किंवा तुमचे यात पैसे गेले तर सुरुवातीच्या पहिल्या तासांत म्हणजेच गोल्डन अवर १९३० क्रमांकावर तक्रार नोंदवली तर तुमचे पैसे रिकव्हर केले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

डिजिटल अरेस्टविरोधात केंद्र सरकार, राज्य सरकार मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. रिंगटोनवरही जाहिराती आहेत. तरीही रोज प्रत्येक दिवशी फसवणूक होत आहे. डिजिटल अरेस्ट हा खोटेपणा आहे, निव्वळ खोटेपणा आहे. कोणालाही फोन आला तर थेट १९३० वर तक्रार करावी, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## अवकाळीचा शेतकऱ्यांना फटका

### लातूर जिल्ह्यातील काही भागात गारपीट; काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सोमवारी अवकाळी पावसासह काही ठिकाणी चांगलीच गारपीट झाली आहे. काढणीला आलेल्या पिकांचे यामुळे नुकसान होत आहे.



रेणापूर तालुक्यातील पानगाप येथे गारांसह २० मिनिटे पाऊस झाला. अहमदपुर शहर व तालुक्यात अवकाळी पाऊस झाला. चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ परिसरात रविवारी रात्री हलक्या सरी कोसळल्या. सध्या परिसरात पुन्हा मोठ्या प्रमाणात आभाळ दाटून आले आहे. जोराचा वारा सुरू होता जवळपास १० मिनिटे पाऊस झाला. शिरूर अनंतपाळ येथे ही जोरदार वारे आणि पाऊस झाला. गुडसुर परीसरात रिमझिम पाऊस सुरुवात झाली आहे. उदगीर तालुक्यातील ढगाळ वातावरण होते. येरोळ येथे वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. निलंगा व परिसरात मेघ गर्जनेसह दमदार पावसाला सुरुवात झाली होती.

अहमदपूर तालुक्यातील किनगाव आणि परिसरात काल दुपारी तीन वाजले पासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरुवात झाली. त्या मुळे बराच वेळ वीज पुरवठा खंडित झाला होता. अचानक आलेल्या गडगडाटासह अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्याने जोरदार थैमान घातल्याने ऊभी पिके जमीनदोस्त झाली. काढणीला आलेले हरभरा, गहू, ज्वारीसह भाजी पाल्याचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परिसरात दुपारनंतर जोरदार वादळी वाऱ्याने थैमान घातल्याने शेतकऱ्यांची धावपळ उडाली. सध्याला ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमे चालू असून अचानक आलेल्या वादळी पावसाने त्या मध्ये व्यत्यय आणल्याने भाविक भक्तांमध्ये ही धावपळ उडाली.

वादळी वाऱ्यासह थैमान घातलेल्या पावसामुळे, आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी मात्र पुन्हा अडचणीत आला आहे. हातातोंडाला आलेले हरभरा, गहू, ज्वारीची पिके मातीत मिसळल्याने शेतकऱ्यांना पुन्हा एकदा माय बाप सरकारच्या आश्वासनावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. तर कांदे, मेथी, टमाटे, शेपू, मिरची, दोडका, कोबी पालेभाज्यांचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या वर्षी भरपूर प्रमाणात मोहर आलेल्या आंब्याचे सुद्धा अवकाळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने नुकसान केले. त्यामुळे शेतकऱ्यांकडून सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी होत आहे.

गेल्या दोन दिवसापासून चाकूर तालुक्यात आवकाळी पाऊस पडत असल्याने पिकांचे नुकसान होणार असून याचा फटका ज्वारीसह अनेक पिकांना होणार असल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे. उन्हाळ्याला सुरुवात झाली असली तरीही आवकाळी पावसाने कहर केला आहे. उन्हाचे तीव्र चटके बसत असतानाचा या पावसाने सुरूवात केली आहे. या पावसाचा फटका रबी पिकांला बसणार असून यात प्रामुख्याने ज्वारी, हरभरा, गहु व तुर या पिकांचे नुकसान होणार आहे. ज्वारीचे पिके आता काढणीस आले असून अनेक शेतकऱ्यांनी हरभरा काढून शेतातच ठेवला आहे. तर यावर्षी आंब्याला मोठ्या प्रमाणात तोर लागला असून या आवकाळी पावसामुळे व वादळामुळे नुकसान होणार आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना अर्थिक झळ सोसावी लागत असल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे.

### पवारांची तिसरी पिढी राज्यसभेत जाणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपला 'पत्ता' खोलला आहे. सोमवारी रात्री पार पडलेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांना राज्यसभेच्या रिंगणात उतरवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, पक्षाची सर्व धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवत त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीची खलबते पार पडली. या बैठकीला सुनेत्रा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. मागील लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पार्थ पवार सक्रिय राजकारणापासून काहीसे दूर होते.

### प्रभात किरणे

ज्यांचे चित नसे स्थिर
पोखरून टाकते शरीर
जैसे भुंगा करी लाकडास
तैसे करीत असे मानसास
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

## दयानंद शिक्षण संस्थेत शिवजयंती उत्साहात साजरी; दयानंद न्यूज चॅनेल' व 'ई-मॅगझिन'चे दिमाखदार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध विधायक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या सोहळ्याचे औचित्य साधून दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातील नवनवीन उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी महाराजांचे विचार आणि त्यांचे व्यवस्थापन कौशल्य आजच्या काळातही कसे मार्गदर्शक आहेत, यावर प्रकाश टाकला.

या सुवर्णक्षणी दयानंद कला महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या 'दयानंद न्यूज चॅनेल'चे श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते अधिकृत उद्घाटन करण्यात आले.




विद्यार्थ्यांच्या कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याचसोबत प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी शिक्षकांना 'ई-सेवा पुस्तिका' प्रदान करण्यात आल्या आणि संस्थेच्या डिजिटल वाटचालीचा भाग म्हणून 'ई-मॅगझिन'चेही प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता अत्यंत उत्साही वातावरणात झाली. डॉ. संदिपान जगदाळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा प्रसंग पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत केला. त्यांच्या पहाडी आवाजातील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास मा. श्री. जयप्रकाश दरगड, संस्थेच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक व कार्यालयीन सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरमध्ये ३० ते ३२ विद्यार्थ्यांना बेदम मारहाण, शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी घटना

**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षक आणि विद्यार्थी याच्यातलं नातं हे गुरू शिष्याचं नातं असतं. पण या नात्याला बट्टा लावण्याचा प्रकार लातूरमध्ये घडला आहे. इथे शिक्षकाने रागाच्या भरात विद्यार्थ्यांसोबतच नको ते कृत्य केले आहे. त्याने सगळेच जण हादरले आहेत. शिवाय विद्यार्थ्यांमध्ये ही भितीचे वातावरण आहे. शाळा प्रशासनाच्या ही हा प्रकार लक्षात आल्यानंतर ते ही चिंतेत आहेत. पालकांचा तर हा प्रकार समोर आल्यानंतर पारा चढला आहे. त्यांनी शाळा प्रशासनाला झालेल्या कृती बद्दल जाब विचारला आहे. शिवाय कडक पावलं उचलण्याची मागणी लावून धरली आहे. त्यामुळे शाळा प्रशासनावरही दबाव वाढला आहे.



लातूर जिल्ह्यातल्या अहमदपूर पासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर क्रिस्ट इंटरनॅशनल शाळा आहे. या शाळेत शिकणाऱ्या ३०-३२ विद्यार्थ्यांना शिक्षकाने जबर मारहाण केली. ही मारहाण इतकी जबर होती की त्यांच्या अंगावर काळे निळे डाग पडले. गुराढोरांना मारावे अशा पद्धतीने त्यांना मारण्यात आलं होतं. त्यामागचं कारण ऐकून तुम्ही ही डोक्याला हात मारून घ्याला. उज्वल सोनी असं या शिक्षकाचे नाव आहे. त्यांचा क्लास झाल्यानंतर काही विद्यार्थी हॉस्टेलच्या दिशेने जात होते.

तिथेच त्यांची दुचाकी पार्क केली होती. त्यांनी दुचाकी पाहीली असता नंबर प्लेट वाकडी झाली होती. शिवाय गाडी ही सुरू होत नव्हती. याचा जाब त्यांनी तिथे असलेल्या विद्यार्थ्यांना विचारला. त्यांनी रागाच्या भरात तिथे असलेल्या ३० ते ३२ मुलांना जबर मारहाण करायला सुरूवात केली. गाडीसोबत काय केले सांगा अशी विचारणा ते विद्यार्थ्यांना करत होते. सोबत त्यांची धुलाई ही करत होते. ही माहिती प्राचार्या जेबा नाडेर यांना समजली. त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. शिवाय शिक्षकाला मारहाण करण्यापासून रोखले. शिवाय जखमी विद्यार्थ्यांना प्रथमोपचार देण्यात आला.

शाळेच्या प्राचार्य जेबा नाडेर यांनी सांगितले की आम्ही शिक्षका विरोधात गुन्हा दाखल केला आहे. शिवाय त्याला पोलीसांच्या स्वाधिन ही केले आहे. त्याच बरोबर शाळा प्रशासनाने त्या शिक्षकाला तात्काळ निलंबित केले आहे. अशी माहिती प्राचार्या नाडेर यांनी दिली आहे. तर पालकांनी झालेल्या प्रकाराबाबत आम्हाला कोणती ही माहिती देण्यात आली नव्हती. आम्हाला अंधारात ठेवण्यात आले असा आरोप केला आहे. जेव्हा आम्ही हॉस्टेलमध्ये फोन केले तेव्हा तासभर ते कुणीच उचलले नाहीत असा ही आरोप करण्यात आला आहे. संबंधीत शिक्षकावर कडक कारवाईची मागणी त्यांनी केली आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



५०% आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लांबणीवर - सुप्रीम कोर्ट

### चिमटा दयाचा



लातुरातील सिग्नल व्यवस्था बिघडली आहे! वाहतूक कोंडी होत आहे!! शिस्त लावणे अवघड आहे!!!

## गारपीट, अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा-पालकमंत्री भोसले

### वादळी वारे, विजांचा कडकडाट होत असताना नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. या नुकसानीचे पंचमाने तातडीने करण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज दिल्या. त्यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्याकडून दूरध्वनीद्वारे जिल्ह्यातील नुकसानीची माहिती घेतली.



रेणापूर, अहमदपूरसह इतरही तालुक्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वाऱ्यामुळे शेतपिकांच्या नुकसानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे संबंधित तालुक्यातील सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. यासोबतच घरांची पडझड झालेल्या ठिकाणी नागरिकांना आवश्यक मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी. आगामी काही दिवस अवकाळी पावसाचा इशारा असल्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सतर्क राहावे. वादळी वारे, विजांचा कडकडाट होत असताना नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना द्याव्यात, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले.

प्राथमिक अहवालानुसार सोमवारी रेणापूर तालुक्यात काही ठिकाणी, तसेच निलंगा तालुक्यातील लिंबाळा परिसरात वादळी वारे, अवकाळी पाऊस व गारपीट झाली. तसेच औसा तालुक्यातील किल्लारी परिसरात, जळकोट तालुक्यातील काही ठिकाणी अवकाळी पाऊस झाला आहे. यामुळे काही गावांमध्ये पत्र्याची घरे अंशतः नुकसानग्रस्त झाली आहेत. तसेच गहू, हरभरा व ज्वारी पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच उदगीर तालुक्यातील वायगाव येथे शेतात काम करत असताना अंगावर वीज पडल्याने दिगंबर राम बेलकुंडे (वय ६० वर्षे) यांचा मृत्यू झाला. इतर तालुक्यातील नुकसानीचीही माहिती घेण्यात येत असून सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरू करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

### रेणापूर तालुक्यासह लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसाने शेती पिकांना फटका; नुकसानीचे तातडीने पंचनामे व्हावेत : धिरज देशमुख यांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गारपीट झाल्यामुळे गहू, हरभरा व इतर पिकांचे नुकसान झाले असून आंबा व द्राक्ष या फळबागांनाही फटका बसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत.



अचानक ओढवलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हतबल झाला असून उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने आर्थिक संकट निर्माण झाले आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नुकसानग्रस्त भागात पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केली आहे.

आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर अवकाळी पावसाने दुहेरी संकट ओढवले आहे. त्यामुळे प्रशासनाने विलंब न लावता सर्वेक्षण करून तातडीने मदत वितरित करावी. तसेच शेतकऱ्यांना पीकविमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राज्याचा अर्थसंकल्पीय अधिवेशन

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू झाले आहे. रविवारी विरोधकांना चहापानास निमंत्रण दिले असताना त्यांनी बहिष्कार घातला होता. त्यामुळे विरोधक सत्ताधाऱ्यांना आडचणीत आणण्याचा प्रयत्न करणार आहेत. पहिल्याच अजितदादा पवार यांच्याबाबत बोलले. यापुढेही आता काही ज्वलंत बाबीवर जसे ना. झिरवाल, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघाता बाबत चौकशी, राज्यातील विविध बाबी जे विरोधक समोर आणतील. ते जनतेला कळणार आहेत. राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री मांडतील, त्यात काय असेल किंवा जनतेसाठी कोणत्या बाबी असतील यावर आता पासून जनतेत चर्चा सुरू आहे. विरोधक यावेळी चांगलेच सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न करणार यात शंका नाही. तसे पाहिले तर केंद्राचा अर्थसंकल्प जनतेला खुश करणारा ठरला तसाच राज्याचा असणार असे वाटते. अधिवेशन म्हटले की, गोंधळ आला, त्यामुळे सभागृहाचे कामकाज वारंवार तहकुब करावे लागते. यामुळे वेळ व जनतेचा पैसा वाया जातो. हे अनेकदा जनतेच्या लक्ष आले आहे. केंद्राचे ज्यावेळी अर्थसंकल्प अधिवेशन सुरू झाल्यापासून सत्ताधारी व विरोधकात खटके उडत आहेत. संघर्ष चालू आहे. त्यामुळे पुर्णविळ अधिवेशन चालत नाही ही मोठी शोकांतिक दिसून येत आहे. सत्ताधारी पेक्षा विरोधकावर मोठी लोकशाही जपण्याची जबबादारी असते. त्यामुळे जबाबदारपने वागले पाहिजे. वारंवार सभागृह तहकुब होत असेल तर जबाबदार कोणाला धरावे हा मोठा प्रश्न आहे. जनतेनी हा पेच सोडविला पाहिजे. पुर्ण वेळ व काळ सभागृह चालले पाहिजे अशी एखादी योजना सर्वसामान्यांनी सुचविण्याची गरज आहे. सतत संघर्ष झाला की, कामकाजावर बहिष्कार? बहिष्कार घालण्यासाठी लोकप्रतिनिधी निवडले आहे का? सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवून जनतेच्या रेटाने कामे होणे अपेक्षित आहे. विरोधकांसोबत जनता का दिसून येत नाही. यामागील कारणे कोणती. विरोधकांनी ताकद जनता आहे. जनतेच्या पाठींब्यावर दबाब गट निर्माण होवू शकतो. मुळात केंद्रात तर विरोधक कशी आपली जबाबदारी पार पडतात हे सर्वांना दिसून येते. राज्यात विरोधकात किती एकी दिसून येते हाही विचार करायाला लावणारी बाब आहे. सत्ताधारी व विरोधक मिळून कामे होणे अपेक्षित आहे. जनतेला काम होणे, विकास होणे एवढेच अपेक्षित असते. बाकी काही देणे-घेणे दिसून येत नाही. विरोधकांची भुमिका चहापानावर बहिष्कार टाकणे म्हणजे जनतेची कामे होतील असे नाही. सत्ताधाऱ्यावर अंकुश ठेवलाच पाहिजे. त्यापेक्षा विरोधकांची संख्या कमी असली तरी एक दबाब निर्माण केला पाहिजे. पुर्वी विरोधकांची सत्ताधारी एकत होते. त्यांनी एखादी योजना सादर केली तर बहुमताने मंजूर केली जात होती. काही बाबतीत विरोधकांचा सल्ला सतत घेतला जात होता. आलिकडे ही प्रथा दिसून येत नाही. विरोधकांनी काही झाले तरी चर्चेत सहभागी झाले पाहिजे. चर्चेला सत्ताधाऱ्यांना भाग पाडले पाहिजे. अशी ताकद निर्माण करण्याची गरज आहे. सभागृह म्हटले की, गोंधळ ठरलेला दिसून येतो ही परिस्थिती बदलण्याची गरज होती. गोंधळाने काय साध्य होते. याचा तरी विचार केला पाहिजे. मुळात राज्यात किंवा केंद्रात सर्वसाधारण व्यक्तीला अधिवेशनाची खरीच गरज आहे का असा प्रश्न निर्माण होत आहे कारण गोंधळामुळे नाराजी निर्माण होत आहे. मुळात अर्थसंल्पीय अधिवेशन असल्याने सर्वाधिक चर्चा ही अर्थसंकल्पावर होणे अपेक्षित आहे. इतरही चर्चा अपेक्षित आहे. सध्याला एक विषय व चर्चा दुसरीच, त्यातमुळे काय होत आहे. मुळ जनतेची अपेक्षा आहे त्यावर पाणी फिरले जात आहे हे योग्य नाही. जनतेच्या सहज व थेट प्रश्नाची सोडवणुकीसाठीचे स्थान अधिवेशन आहे. लोकशाहीत ही सर्वात मोठी शक्ती आहे. लोकप्रतिनिधी थेट काहीही व कोणतेही प्रश्न विचारू शकतात. सत्ताधाऱ्यांना त्याचे निरसण करावे लागते. त्याच प्रमाणे सत्ताधारी सुद्धा अधिवेशन काळात जागृत, सतर्क राहातात. त्यांना माहीती असते की, विरोधक व कोणताही लोकप्रतिनिधी काही ही विचारू शकतो. माहिती गोळा करून पुराव्यासह जाहिर मांडण्याचे लोकशाहीत मजबुत ठिकाण हे अधिवेशन आहे. विविध अधिवशेन वर्षातून होत असतात. राज्यात मुंबई व नागपूरात हिवाळी अधिवेशन होतात. त्यामुळे एक मोठी संधी लोकप्रतिनिधी हाती येते. त्यामुळे अधिवेशन काळा हा महत्त्वाचा समजला जातो. यामध्ये लोकप्रतिनिधीची उपस्थिती आवश्यक आहेत. आपल्या मतदार संघात दिलेली आश्वासने पुर्ण करून ती पदरात पाडून घेण्याची संधी म्हणजे अधिवेशन आहे हे विसरता येत नाही. यात आलिकडे काय होत आहे तर लोकप्रतिनिधी अनुपस्थिती दिसून येते. मंत्रीगणाची प्रश्नोउत्तराच्यावेळी उपस्थित न राहाणे असे प्रकार कमी झाले पाहिजे. या काळात मोर्चे निघतात. हिवाळी अधिवेशनात नागपूरात अनेक मोर्चे निघतात तसे मुंबईत अधिवेशन काळात निघतात. यामागील कारणे म्हणजे सरकारचे लक्ष वेधले जाते. विरोधकांचेही लक्ष जावून मदत मिळते. सभागृहात विषय मांडता येतो. त्याची सोडवणुक होते. त्यामुळे अधिवेशनाचा काळ हा महत्त्वाचा आहे. तो कोणत्याही परिस्थिती मिनीट ना मिनीट हा महत्त्वाचा आहे. ही बाब जनतेला दिसून येत आहे. त्यामुळे अधिवेशन काळात सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे हा सर्वात महत्त्वाचा व जिव्हाळ्याची बाब आहे. आलिकडे कितीवेळ कामकाज चालते हे जनतेला समजते, कारण थेट दुरदर्शनाचे प्रक्षेपन दिसते. घराघरात कामकाज काय चालले आहे. सत्ताधारी व विरोधकांची वर्तन दिसते. विरोधक कस आक्रमक होताना दिसून येते. एकीकडे लोकशाहीने त्याच बरोबर घटनेनुसार चालावे असे जाहिर सांगितले जाते तर दुसरी कडे तसे वागताना दिसून येते. किती गोंधळ घातला जातो. यावेळी माननिय अध्यक्षांची स्थिती कशी होते याचे थेट दर्शन दुरदर्शनवरून दिसून येत आहे. त्यामुळे जनतेचा मोठा यात खर्च होत असल्याने ज्या उद्देशाने अधिवेशन भरविली जाता त्याचा हेतू सफल झाला पाहिजे. यासाठी सर्वांनीच विचार केला पाहिजे किंबहून करावा. कोणत्याही परिस्थितीत अधिवेशन काळ व वेळ वाया जावू न देणे हे अपेक्षित आहे. लोकशाहीत महत्त्वाच्या ठिकाणाचा आदर व्हावा व जनतेचा हेतू सफल व्हावा. अधिक कामे यात सफलतेने होणे अपेक्षित आहे.

वृक्ष तोड वाचवा : माणूस व निसर्ग जगवा..

# कंपाऊंड वॉलच्या नावे विवेकानंद चौकात मनपाकडून वृक्ष तोड ; नागरिकात नाराजी

## स्वतः आयुक्तांनी लक्ष घालण्याची मागणी



**लातूर/प्रतिनिधी :**केवळ कंपाऊंड वालच्या नावे, खुद्द लातूर शहर महानगर पालिकेकडून, शहरातील विवेकानंद चौकामध्ये सारोळारोड लगतच्या, अक्षरशः मोठ मोठया वृक्ष- झाडांची कत्तल, काल शनिवार २१ फेब्रुवारी पासून करण्यात येत असून, ती अद्याप आजही चालूच राहणार असल्याने, परिसरातील वृक्ष व निसर्गप्रेमी नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करून, या गंभीर प्रकरणी स्वतः आयुक्तांनी लक्ष घालून, सदर अन्यायी वृक्षहत्या त्वरीत थांबवावी, अशीही त्यांनी जाहीर मागणी केली आहे.

नांदेडरोडवरील विवेकानंद चौकामध्ये मनपाचे जलकुंभ आहेत. आणि तेथेच या भागाचे पोलिस ठाणेही आहे. या चौकातून एक सारोळा मार्ग जातो आहे. त्या रोडवरच एक मोठे मंदिर पण आहे. येथे मनपाच्या उर्वरित काही जागेत, अग्नीशामक दलाचे कार्यालय उभारण्यात येणार आहे, असे मनपा कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येते. आणि त्यासाठी म्हणून शुक्रवार २० फेब्रुवारी रोजी, मनपाच्या वरिष्ठानी प्रत्यक्ष पाहणी केली. आणि काल शनिवार २१ फेब्रुवारीपासून, एका मोठ्या यंत्राने येथील वृक्षांची कत्तल सुरु झाली आणि ती तशीच आजही पुढे चालूच राहणार असल्याचे, या भागातील प्रत्यक्षदर्शी नागरिकानी सांगीतले. काल दिवस भरात लहान- मोठी अशी, अनेक झाडे विनाकारण तोडली गेली. आजही येथील उभ्या असलेल्या उंबर, पिंपळ आदी मोठ्या व जुन्या वृक्षांवर, ते अशीच मनमानी यंत्र हत्यार चालविणार आहेत.

तुमचे कोणतेही ऑफिस आणा आणि ते येथे थाटा. मात्र अशी नाहक झाडे तोडू नका. मुळात वृक्ष लागवड कमी. त्यातूनही त्याची जपणूक फारच ऊणी. सध्या तीव्र उन्हाळा चालू झाला आहे. आणि आपल्याकडे तो ४१ अंशावर जात आहे. मग रोड कडेची व चौकाजवळ वस्त्यालगतची ही अशी वृक्ष तोड का व कशासाठी ? असा प्रश्नही रहिवास्यांनी उपस्थित केला आहे. आम्ही सामान्य नागरिकांनी मोठ्या अपेक्षेने, मनपा प्रतिनिधीना निवडून दिले आहे. मात्र हा अपेक्षा भंग होतोय की काय ? असा संतापही येथे व्यक्त होत आहे. तीव्र उन्हात या वृक्षाखाली थंड सावलीत जनावरे, पशु-प्राणी, मुल व ज्येष्ठ नागरिक विरंगूळ म्हणून बसतात. तसेच तेथे मंदिर असल्याने भक्त बाया- पोरांची वर्दळ पण खूप असते. या सर्व बाबींचा विचार का होत नसावा ? असेही मागरिक खेदाने बोलत आहेत.

तेव्हा या प्रकरणी स्वतः मनपा आयुक्तांनी तातडीने लक्ष घालावे. येथील चालू बेसुमार वृक्षतोड थांबवावी. आणि सदर गंभीर कृत्य करणाऱ्यांविरुद्ध कठोर कार्यवाही करावी. आणि तोडलेली वृक्ष पूर्ववत उभे करून, त्याच्या देखभालीचे बंधनपण त्यांच्यावरच सोपविण्यात यावे, अशी आग्रही जाहीर मागणी ज्येष्ठ नागरिक गणपतराव तेलंगे, हरिदास गिरी महाराज, वसंतराव मिरकले, दिगंबरराव बारस्कर, पी. के.गायकवाडदादा, दिगंबरराव भोसले, माधवराव गायकवाड, अमोल सुर्यवंशी, आत्माराम गिरी, प्रा. रामकिशन समुखराव, श्री गंगाधरराव नागरगोजे, संभाजीराव दोरवे, सिताराम पवार, राजाभाऊ कांबळे, अतिष नवगीरे आदीनी केली आहे.

# कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी प्रल्हाद विठूबोयने तर सचिवपदी श्री अंकुश काळे यांची निवड



**निलंगा/आयुब बागवान:** महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १९फेब्रुवारी रोजी पार पडली या सभेत अध्यक्षपदी श्री प्रल्हाद विठूबोयने तर सचिव पदी श्री अंकुश काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

श्री अंकुश काळे, सचिव निलंगा आगार यांच्या वतीने सन २०२५चा वार्षिक अहवाल सादर करण्यात आला. तर अध्यक्ष श्री राजकुमार सूर्यवंशी यांनी २०२५मध्ये कामगार संघठनेच्या माध्यमातून केलीली कामे सांगितली.या निवडीसाठी विभागीय कार्यकारिणी सदस्य श्री प्रकाश शानिमे, श्याम यरनवाड. एस. टी. सोसायटी संचालक श्री उद्धव गौण्डगावे, तुकाराम चौधरी, रामराजे कांबळे याने काम केले.निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी प्रास्ताविक श्री रामराजे कांबळे यांनी केले तर आभार अनिल बिराजदार यांनी केले.सोबत गोविंद कन्हेरे, बसवराज स्वामी, दयानंद बडगे,धीरज भालके, उमेश सांडूर, हणमंत पाटील, दत्ता शिंदे, दयानंद मलशेट्टे, भगवान राजे, सुभाष शेंद्रे, गफ्फार बागवान, सतीश तुगावे, काकणाले पांडुरंग, संतोष गायकवाड, चंदू शिंदे, राम मारापल्ले, सुधाकर वडमिले, विनोद कलबुर्गे, बेंडले, दिलीप येडले,शाहू बोरुळे,संजीव कदम, परवेज सय्यद, लिंबाराज कदम,राम शेंद्रे आणि शेकडो सभासद उपस्थित होते.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या रासेयो शिबिराचा समारोप




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास '' या विषयांतर्गत मौजे चांडेश्वर ता. जि. लातूर याठिकाणी सात दिवसीय निवासी विशेष वार्षिक युवक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचा समारोप करण्यात आला.

समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. बालाजी शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. रघुनाथ वडुळकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. राहुल वाघमारे, प्रा. प्रियंका इंगळे,प्रा. रवि चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

या समारोप समारंभाप्रसंगी बोलताना प्रा.डॉ.बालाजी शिंदे म्हणाले की, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी चांडेश्वर येथे या शिबिराच्या माध्यमातून राबवलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले.विद्यार्थ्यांनी भविष्यातही आपापल्या क्षेत्रात सेवाभाव जोपासून समाजाची सेवा करावी आणि आपल्या कार्यातून आपल्या आई - वडिलांची मान उंचावेल असे विधायक कार्य करावे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी शिबिरात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे आणि रासेयो च्या स्वयंसेवकांनी शिबिर कालावधीत केलेल्या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या समाज उपयोगी वृत्तीला चालना देणारे विविध उपक्रम भविष्यातही राबविणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी साक्षी नगुरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार वेदांती वानखेडे यांनी मानले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी चांडेश्वर येथील ग्रामस्थ,महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ५० विद्यार्थ्यांचा,सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग लाभला.

# कर्करोगाच्या रुग्णांसाठी औषधासारखे काम करते केसर! मात्र, जास्त प्रमाणात खालं तर..



केशर हा एक स्वादिष्ट मसाला आहे ज्याचा सुगंध तीव्र असतो आणि तो त्याच्या आरोग्यदायी फायद्यांसाठी प्रसिद्ध आहे. तसंच केशर हा जगातील सर्वात महागडा मसाला मानला जातो. कारण त्याच्या प्रत्येक फुलातून फक्त लाल रंगाचे तीन धागे तयार होतात, ज्यांना केशर म्हटलं जातं. केशर हे क्रोकस सॅटिव्हस फुलापासून काढले जाते, ज्याला सामान्यत: ''केसर क्रोकस'' म्हणून ओळखलं जातं.

याव्यतिरिक्त, केशरचे इतर मसाल्यांपेक्षा जास्त आरोग्य फायदे आहेत. ते मेंदूच्या आरोग्यास प्रोत्साहन देते आणि नैराश्याची लक्षणे कमी करण्यास देखील मदत करते. मात्र, त्याच्या जास्त सेवनाने आरोग्याला गंभीर नुकसान होऊ शकते का? तसंच केशरची कर्करोगाशी लढण्याची क्षमता आणि इतर आरोग्य फायद्यांबद्दल अधिक जाणून घ्या...

केशर कर्करोगाशी लढण्यास मदत करतो का? केशरला एक जटिल चव आहे. केशरच्या फुलांचा, मधाचा आणि गवतासारखा सुगंध येतो. तसंच त्याची चव किंचित कडू गोड असते. शिवाय, नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनात असं सूचित करण्यात आलं आहे की, केशरमध्ये कर्करोग आणि इतर गंभीर आजारांशी लढण्याची क्षमता देखील असू शकते. हा मसाला त्याच्या औषधी गुणधर्मासाठी प्रसिद्ध आहे. केशर अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. केशर किंवा क्रोकसमध्ये लक्षणीय अँटीट्यूमरजेनिक गुणधर्म असतात. जे कर्करोगासारख्या आजारांशी संबंधित हानिकारक मुक्त रॅडिकल्स दूर करण्यास मदत करतात.

वेबएमडी नुसार, केशरमध्ये अशी रसायने आढळतात, जी मूड सुधारण्यासाठी फायदेशीर आहेत. तसंच यातील काही रसायनामुळे कर्करोगाच्या पेशी मारू शकतात, जळजळ कमी करू शकतात आणि अँटीऑक्सिडंट म्हणून काम करू शकतात. एक पौंड केशर मसाला तयार करण्यासाठी ७५,००० केशर फुलं लागतात. इराणमध्ये केशरची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. हा जगातील सर्वात महागड्या मसाल्यांपैकी एक आहे.

**केशरचे इतर फायदे**

हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर: केशरमध्ये थायामिन आणि रिबोफ्लेविन सारखे खनिजे आढळतात. जे हृदयाचे आरोग्य सुधारतात. आहारात केशरचा समावेश केल्याने रक्ताभिसरण वाढते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यांना दूर होण्यास मदत होते. तसंच केशर रक्ताभिसरण प्रणाली देखील सुधारते, ज्यामुळे रक्तदाब कमी होतो आणि हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक टाळता येतो. हा मसाला कामोत्तेजक म्हणून काम करू शकतो आणि लैंगिक जीवन सुधारू शकतो.

लैंगिक जीवन: केशर कामवासना (लैंगिक इच्छा) वाढवण्यास देखील मदत करू शकते. त्याच्या संभाव्य कामोत्तेजक गुणधर्मासाठी ओळखले जाणारे, ते अँटीडिप्रेसंट घेणाऱ्या लोकांसाठी सर्वोत्तम कार्य करते. क्लिनिकल अभ्यासात असं आढळून आलं आहे की, केशरचे इरेक्टाइल डिसफंक्शन आणि एकूणच लैंगिक इच्छांवर सकारात्मक परिणाम होतात, जरी त्यामुळे वीर्य गुणवत्ता सुधारण्याची शक्यता कमी आहे. (लक्षात ठेवा की कामोत्तेजकांना प्रेमाचे पदार्थ म्हणून ओळखले जाते. ते अन्न आणि औषधांमध्ये कमी प्रमाणात आढळतात. लैंगिक आरोग्य समस्यांनी ग्रस्त लोक त्यांची लैंगिक इच्छा वाढवण्यासाठी त्यांचा वापर करतात.)


''सूर्यप्रकाशाचा मसाला'' म्हणूनही देखील ओळखले जाते. जर्नल ऑफ बिहेवियरल अँड ब्रेन सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, केशर अर्क मेंदूतील डोपामाइनची पातळी वाढवते, मेंदूतील इतर हार्मोन्सच्या पातळीत बदल न करता. केशर सप्लिमेंट्स मूड सुधारतात आणि अँटीडिप्रेसंट म्हणून देखील काम करतात असे म्हटले जाते.

वजन कमी करण्यास मदत करते: संशोधनातून असं दिसून आलं आहे की, केशर भूक नियंत्रित करण्यास, जास्त खाण्यापासून रोखण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करू शकते. जर्नल ऑफ कार्डिओव्हस्कुलर अँड थोरॅसिक सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे की केशर अर्क बॉडी मास इंडेक्स (ँ१६) कमी करण्यास मदत करू शकतो, विशेषत: कोरोनरी आर्टरी डिसीज असलेल्या रुग्णांमध्ये. याव्यतिरिक्त, वजन पाहणाऱ्यांसाठी केशर उपयुक्त ठरू शकते.

मेंदूची शक्ती आणि स्मरणशक्ती सुधारण्यास उपयुक्त: संशोधकांचा असा विश्वास आहे की, केशरमधील दोन रासायनिक संयुगे, क्रोसिन आणि क्रोसेटिन, स्मरणशक्ती वाढवू शकतात आणि मेंदूचे कार्य सुधारू शकतात. २०१५ च्या एका अभ्यासात असं दिसून आलं आहे की, केशर मेंदूतील जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह नुकसान कमी करू शकते. ज्यामुळे मज्जासंस्थेला होणारे काही नुकसान टाळता येतात. काही संशोधनात असंही सूचित करण्यात आलं आहे की, केशर सेवन केल्याने अल्झायमरची लक्षणे कमी होण्यास मदत होऊ शकते.

जास्त केशर खाल्ल्यास या समस्या: आरोग्य तज्ज्ञांच्या मते, जास्त केशर खाल्ल्याने त्वचा आणि डोळे पिवळे होऊ शकतात. केशरमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन सी आणि लोह यासारखे पोषक घटक असतात. ते अन्नाची चव आणि सुगंध वाढवते. ते शरीराला उबदार ठेवण्यास देखील मदत करते. केशरचे जास्त सेवन केल्याने रक्तदाब कमी होऊ शकतो. ही गंभीर समस्या टाळण्यासाठी, केशरचे सेवन कमी प्रमाणात करावे.

अनेक अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, जास्त प्रमाणात केशर सेवन केल्याने बायपोलर डिसऑर्डरचा धोका वाढतो. तसंच जास्त प्रमाणात केशर सेवन केल्याने शरीरात अँटीजेन्स वाढू शकतात, ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. जास्त प्रमाणात केशर सेवन केल्याने नाकातून रक्तस्त्राव होऊ शकतो आणि पापण्या आणि ओठ सुन्न होऊ शकतात. म्हणून, केशरचं सेवन कमी प्रमाणात केलं पाहिजे.



# निद्रानाशः ते काय आहे, लक्षणे, कारणे आणि उपचार

शांत झोप आमच्यासाठी महत्त्वाची आहे एकूण आरोग्य आणि फिटनेस. असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीसाठी नियमितपणे व्यायाम करणे किंवा निरोगी आहार राखणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे, दिवसभर तुम्हाला उत्साही ठेवण्यासाठी दर्जेदार झोप आवश्यक आहे.

जर तुम्हाला सतत झोप येण्याचा किंवा झोप न लागण्याचा त्रास होत असेल तर तुम्हाला निद्रानाश नावाचा झोप विकार आहे. एखादी व्यक्ती जी अनेक तासांच्या झोपेनंतर उठू शकते तरीही थकवा जाणवत असेल, थकवा जाणवत असेल किंवा दिवसभरात काम करणे किंवा लक्ष केंद्रित करणे कठीण होत असेल, तर त्याला/तिला निद्रानाश होतो, ज्याचा आपल्या मानसिक आणि शारीरिक स्थितीवरही परिणाम होतो.

अनिद्राची लक्षणे कोणती?

खालील आहेत निद्रानाशाची चिन्हे/लक्षणे:

रात्री झोप लागण्यास त्रास होतो

रात्री खूप वेळा जागे होणे

रात्री उठल्यानंतर झोप परत येण्यात अडचण

सकाळी खूप लवकर उठणे

रात्रीच्या झोपेनंतर ताजेतवाने वाटणे किंवा नीट विश्रांती न घेणे

दिवसा थकवा किंवा कमी ऊर्जा

एकाग्र करणे, लक्ष केंद्रित करणे किंवा गोष्टी लक्षात ठेवण्यात अडचण

चिडचिड, चिंता किंवा नैराश्य

एकाग्रतेच्या अभावामुळे किंवा झोप न लागल्यामुळे वाढलेल्या चुका किंवा अपघात

तणाव डोकेदुखी-झोपेच्या विस्कळीत नमुन्यांमुळे अपचन किंवा पोटात अस्वस्थता यासारखी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल लक्षणे

झोपेबद्दल सतत चिंता किंवा चिंता

वरील सर्व लक्षणे तुम्हाला चिडचिड करतात; तुम्हाला सतत थकवा आणि मूड स्विंग जाणवू शकतो. लक्ष केंद्रित करणे आणि गोष्टी लक्षात ठेवणे कठीण होते. निद्रानाशाचे प्रकार काय आहेत?

कालावधीवर आधारित निद्रानाशाच्या विविध प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

क्षणिक निद्रानाश - एक महिन्यापेक्षा कमी काळ टिकतो

तीव्र किंवा अल्पकालीन निद्रानाश - एक ते सहा महिने टिकते. तीव्र निद्रानाश - सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ टिकतो

निद्रानाशाची कारणे काय आहेत?

निद्रानाशाची कारणे त्याच्या प्रकारानुसार बदलतात. गंभीर निद्रानाशाच्या कारणांमध्ये तणाव, औषधांचे दुष्परिणाम, तुम्ही सहसा झोपता त्या जागेत किंवा स्थानातील बदल, आजारपण, जेट लॅग, तुमच्या शरीरात वेदना किंवा अलीकडच्या काळात घडलेल्या काही त्रासदायक किंवा अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा समावेश असू शकतो. किंवा आधी. तीव्र निद्रानाश सामान्यतः झोपेच्या विकारांमुळे, कर्करोग, मधुमेह, ऍसिड रिफ्लक्स (ज्याला जीईआरडी म्हणून ओळखले जाते) पाठदुखी, संधिवात, चिंता, नैराश्य इत्यादींमुळे उद्भवते. निद्रानाशाची विविध कारणे असू शकतात आणि ती अनेकदा घटकांच्या संयोगातून उद्भवते.

निद्रानाशाची काही सामान्य कारणे आहेत:

ताण आणि चिंता: मानसिक आरोग्य स्थिती जसे की तणाव, चिंता, नैराश्य किंवा जीवनातील महत्त्वाच्या घटनांमुळे झोप लागणे किंवा झोप लागणे कठीण होऊ शकते.

झोपेच्या खराब सवयी: झोपेचे अनियमित वेळापत्रक, उशीरा झोपणे, झोपण्याच्या वेळेची विसंगत दिनचर्या, दिवसा जास्त डुलकी घेणे किंवा झोपायच्या आधी उत्तेजक क्रियाकलापांमध्ये गुंतणे यामुळे शरीराच्या नैसर्गिक झोपेचे चक्र विस्कळीत होऊ शकते.

वैद्यकीय अटी: काही वैद्यकीय परिस्थिती, जसे की तीव्र वेदना, दमा, संधिवात, ऍलर्जी, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्या, न्यूरोलॉजिकल विकार आणि हार्मोनल असंतुलन (उदा. थायरॉईड समस्या), झोपेमध्ये व्यत्यय आणू शकतात.

औषधे: ऍलर्जी, दमा, उच्च रक्तदाब, नैराश्य, आणि -ऊक्कऊ सारख्या परिस्थितींसाठी काही प्रिस्क्रिप्शन औषधे दुष्परिणाम म्हणून झोपेच्या पद्धतींमध्ये व्यत्यय आणू शकतात.

कॅफिन, निकोटीन आणि अल्कोहोल: झोपेच्या वेळी कॅफिन किंवा निकोटीन सारख्या उत्तेजक घटकांचे सेवन केल्याने किंवा जास्त प्रमाणात अल्कोहोल वापरल्याने झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

पर्यावरणाचे घटक: गोंगाट करणारे किंवा अस्वस्थ झोपेचे वातावरण, जास्त प्रकाश, अति तापमान किंवा शिफ्टच्या कामामुळे होणारे व्यत्यय झोपेच्या किंवा झोपण्याच्या क्षमतेत अडथळा आणू शकतात.

जेट लॅग किंवा वेळापत्रकातील बदल: टाइम झोनमध्ये जलद बदल (जेट लॅग) किंवा शरीराच्या अंतर्गत घड्याळात व्यत्यय आणणारे कामाचे अनियमित वेळापत्रक यामुळे निद्रानाश होऊ शकतो.

खराब झोप स्वच्छता: नियमित व्यायामाचा अभाव, खराब आहार, झोपायच्या आधी जास्त स्क्रीन वेळ आणि निळा प्रकाश उत्सर्जित करणारी इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरल्याने झोपेच्या गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम होतो.

वय: झोपेच्या पद्धतींमध्ये बदल आणि वैद्यकीय स्थिती वाढण्याची शक्यता यामुळे वृद्ध प्रौढांमध्ये निद्रानाश अधिक सामान्य असू शकतो.

जननशास्त्र: काही व्यक्तींना निद्रानाश किंवा इतर झोपेच्या विकारांची अनुवांशिक प्रवृत्ती असू शकते

## खोकला व त्याव उपाय



हे सुक्या खोकल्यासाठी उत्तम आहे १.हळदीचे दूध: रात्री झोपण्यापूर्वी कोमट दुधात अर्धा चमचा हळद टाकून प्यायल्याने खोकल्यात आराम मिळतो ३.वाफ घेणे: गरम पाण्याच्या भांड्यात निलगिरी तेल टाकून वाफ घेतल्याने श्वसनमार्ग मोकळा होतो आणि कफ बाहेर पडतो १

**तुळशी आणि मध:** तुळशीच्या पानांचा रस आणि मध समप्रमाणात मिसळून प्यायल्याने घशातील खवखव कमी होते १.

**मिठाच्या पाण्याच्या गुळण्या:** कोमट पाण्यात मीठ टाकून गुळण्या केल्याने घशातील इन्फेक्शन कमी होते. **मसाला चहा:** लवंग, दालचिनी आणि वेलचीचा चहा घेतल्याने घसा सुटतो आणि खोकला कमी होतो ४.

**काही महत्त्वाच्या टिप्स:**

जास्त प्रमाणात गरम पाणी प्या ३. **थंड पेये आणि फ्रीजमधील पदार्थ टाळा.**

जर खोकला आठवड्याभराहून अधिक काळ टिकून राहिला तर डॉक्टरांचा सल्ला घ्या ९. खोकल्यासाठी घरगुती उपाय: प्रभावी व नैसर्गिक उपचार -खोकल्यासाठी घरगुती उपाय * मध आणि आले हे खोकल्यावर सर्वात प्रभावी उपायांपैकी एक आहे.वाफ घेतल्याने श्वसनमार्ग मोकळा होतो आणि खोकला जात नसेल, घसा सतत खवखव करत असेल, तर एक लवंग हळूहळू चावून खा आणि नंतर एक ग्लास कोमट पाणी प्या. यामुळे खोकला थांबतो आणि कफ मोकळा होतो. कोरड्या खोकल्यासाठी १२ घरगुती उपाय -झोपण्यापूर्वी, फक्त १/२ चमचा हळद पावडर घ्या आणि ती एका ग्लास कोमट दुधात मिसळा. यामुळे रात्री खोकला थांबण्यास मदत होऊ शकते.

# ट्रम्प यांना थप्पड

ट्रम्प यांना रोखले

जावे, ही जगभरातील बहुतेक देशांची इच्छा होती. न्यायालयाचा निकाल त्यांच्यासाठी दिलासा आहे. कॅनडासारख्या मित्र देशालाही ट्रम्प विश्वासार्ह वाटत नाहीत, यातच ट्रम्प यांचे 'कर्तृत्व' दिसते. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सणसणीत चपराक दिली. अनेक सार्वभौम देश आणि त्यांचे अध्यक्ष, यांची एखाद्या विदुषकाच्या भूमिकेत जाऊन टवाळी करणार्या ट्रम्प यांच्यासाठी औषधाची मात्रा आवश्यक होतीच. ती मिळाली आहे आणि मनमानी आयात शुल्काचा निर्णय रद्द झाल्याने हे महाशय जगभर हास्यविषय ठरले आहेत! संपर्क साधने, तंत्रज्ञान यातील आमूलाग्र क्रांतीनंतर 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना आकारास आली. त्याला छेद देत डोनाल्ड ट्रम्प जागतिक व्यवस्थेला सुरुंग लावण्यास निघाले. जागतिक व्यापर संघटनाच काय; पण संयुक्त राष्ट्र आणि अमेरिकेकडून पुढारपण होत असलेल्या 'नाटो'ची देखील त्यांनी फिकीर बाळगली नाही. आयात शुल्काचा सर्व देशांसाठी अस्त्रासारखा वापर करणे, हाच मुळात वेडाचार. आयात महाग करून आपण संबंधित देशांसाठी अमेरिकेची बाजारपेठ मर्यादित करत आहोत, यातून अमेरिकेचे हित

साधले जाणार आहे, ही त्यांची, अर्थात त्यांच्या 'तज्ज्ञ' सल्लागारांची भूमिका. आयातीवर लादलेल्या भरमसाठ शुल्कामुळे आयात महाग होऊन त्याचा भुर्दंड अमेरिकेतील ग्राहकांवर पडणार आहे, हा नैसर्गिक तर्क देखील त्यांचा विवेक जागा करू शकला नाही. परिणामी वेगवेगळी कारणे सांगून ट्रम्प यांनी आयात शुल्काच्या नावाखाली दंड आकारणी सुरु केली, सर्वांवर दबाव आणून व्यापार करार करण्यास फर्मावले आणि अमेरिकेत गुंतवणुकीची सक्ती केली. करार करताना अनेक देशांनी गुंतवणुकीचे तोंडदेखले आश्वासन दिले; पण बढाईसाठी ट्रम्प यांना तेही पुरेसे ठरले! अमेरिकी काँग्रेसच्या संमतीशिवाय 'टॅरिफ'चा निर्णय घेण्याचा अध्यक्षांना अधिकार नाही, असा निकाल अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला. सहा विरुद्ध तीन, अशा बहुमताने तो दिला गेला आहे. 'आणीबाणी अधिकार कायद्या'अंतर्गत ट्रम्प यांनी ही मुजोरी केली होती. ज्या परिस्थितीत त्यांनी आयात शुल्क लादले, ती परिस्थिती आणीबाणीची नव्हती आणि तो

अधिकारही त्यांना नव्हता.





अपेक्षेनुसार थयथयाट

हा निकाल आल्यावर ट्रम्प यांनी अपेक्षेप्रमाणे थयथयाट सुरु केला आहे. निकाल देणारे न्यायाधीश परकीय हितसंबंध जपत आहेत, न्यायाधीशांपैकी काहींची आपल्याला लाज वाटते, अशी बेताल भाषा ट्रम्प यांनी केली. यासाठी खरेतर हा निकाल देणारे सरन्यायाधीश जॉन रॉबर्टस् आणि त्यांच्या सहकार्यांनी ट्रम्प यांच्यावर कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. भारतीय वंशाचे विधिज्ञ नील कट्याल यांनी या ऐतिहासिक निकालात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आयात शुल्काच्या विरोधातील त्यांचा युक्तिवाद अतिशय प्रभावी ठरला आणि छोट्या उद्योजकांची बाजू न्यायालयासमोर समर्थपणे मांडली गेली. 'अमेरिकेतील यंत्रणांचे महत्त्व अधोरेखित करणारी घटना', या शब्दांमध्ये नील कट्याल यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली असून ती बोलकी म्हणावी लागेल. 'पडलो तरी नाक वर' ही ट्रम्प यांची वृत्ती असल्याने त्यांनी धमकीसत्र सुरुच ठेवले आहे. याचाच भाग म्हणून त्यांनी सरसकट दहा टक्के आयात शुल्क आकारण्याची घोषणा केली. याला चोवीस तास उलटत नाहीत तोवर त्यात आणखी पाच टक्क्यांची भर टाकत सर्व देशांसाठी पंधरा टक्के आयात शुल्क राहील, असे सांगून टाकले. दंडेलशाहीचे असे दुसरे उदाहरण असू शकत नाही! आता त्यांनी जाहीर केलेला निर्णय पाच महिने वैध राहील. मनमानी शुल्क आकारणीमुळे वेगवेगळे देश, कंपन्या यांचे जे नुकसान झाले त्यांच्याकडून भरपाईची मागणी होऊ शकते. आधीच अडचणीत असलेली अमेरिकेची अर्थव्यवस्था या पेचाला कशी सामोरी जाणार? न्यायालयाने पुरती बेअब्रु केल्यावर देखील आपण सुधारणार नाही, याचे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत. मागील निवडणुकीत पराभव अमान्य करून त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी जो धुडगुस घातला होता त्याला साजेसेच आजचे वर्तन म्हणावे लागेल. जागतिक शांततेसाठी त्यांचा कार्यकाळ यापुढे आणखी धोकादायक ठरणार आहे. अमेरिकी नागरिकांचे लक्ष आपल्या अपयशावरून हटविण्यासाठी त्यांची युद्धखोरी वाढू शकते. हा हुकूमशहा लवकरात लवकर पायउतार होणे जग सुरक्षित ठेवणारे राहील.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**रिलेशनशिपमध्ये आल्यानंतर ...**




कॉर्टेस यांनी किंग कार्लोस पहिले यांना एक पत्र लिहिलं होतं. दक्षिण अमेरिकेत प्यायलं जाणारं चॉकलेट शरीरात प्रतिकारशक्ती वाढवतं तसंच थकवा दूर करतं, असं निरीक्षण नोंदवल्याचा उल्लेख त्या पत्रात आहे.दुर्दैवाने, स्पॅनिश लोकांनी सांगितलेल्या चॉकलेटच्या वैद्यकीय आणि औषधी गुणांना दक्षिण अमेरिकेतील लोकांनी स्वीकारलं नाही.

## २ Joke — विनोद




एक डॉक्टर - तुमच्या दवाखान्यात असं कधी होतं का की एखादा रोगी एखाद्या रोगामुळे मरतो पण शवविच्छेदनात तो दुसऱ्याच रोगाने मेल्याचे कळते. दुसरा डॉक्टर - नाही, आमच्याकडे रोगी त्याच रोगाने मरतो, ज्या रोगासाठी आम्ही त्याच्यावर इलाज केलेला असतो.

## ३ Message — संदेश




Apno ne zehar ka jaam de diya
Gairo ne bewafa naam de diya
Wo jo kehte they bhul na jana hame
Aaj unhone hi bhari MEHFIL ME ANJAAN keh diya...

## ४ Thought — सुविचार




माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

न व्याधिः न विषम् न आपत्तथा न आधिश्चभूतले ।
खेदाय स्वशरीरस्थं मौर्ख्यम् एकं यथानृणाम् ।।

अर्थ : स्वतःचा मूर्खपणा माणसाला जितका खेदजनक असतो, त्याप्रमाणे आजार, विषय, संकटे आणि मनोव्यथासुद्धा दुःखदायक नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. लक्ष्मीचे वाहन
४. हिशेबात घोटाळा करून पैशाचा अपहार
९. 'अशी --- येती, आणिक स्मृती ठेवूनी जाती' (सुधीर फडके)
११. दहावी रास
१२. घट्ट
१३. घोड्याचे घर
१५. अनाथ
१७. आकाश, वस्त्र
१९. चकचकीत, स्वच्छ
२२. खर्चात कपात
२४. अव्यवस्थित कारभार
२५. पंख
२७. वाळवंट
२८. ही टाकणे म्हणजे नवीन रूप धारण करणे
२९. स्वीकार
३०. गार
३१. ओझ्याचा प्राणी
३२. बारीक मण्यांची माळ, देवीपुढची मशाल
३३. फळांपासून केलेले पेय
३५. दिवस
३७. भोळा याअर्थी शंकराचे नाव
३९. बंधन नसलेला
४१. अग्नी
४३. रोख रक्कम
४५. आल्या पावली लगेच
४८. चिंचेची चव
४९. बुटका, अरूंद तोंडाचा माठ
५०. बाज विणण्याची कापडी पट्टी
५२. आश्रय, टेकू
५३. कधी कधी पंख नसले तरी हे शक्य होते!
५४. प्रफुल्लित
५७. हात आणि दंड यांना जोडणारा भाग
५८. गाय
५९. वेदनेने भरलेले
६१. नेपाळमधील या नदीत 'शाळिग्राम' सापडतात
६३. तमाशात काम करणारा
६५. ज्योतिषानुसार नक्षत्रांची अनुकूलता
६७. संकट
६८. आठवण
६९. ही कधीही सांगून येत नाही!
७०. जाग येईल तीच खरी उगवतीची वेळ पण हिंदीत
७२. बदाम, पिस्ता, काजू इत्यादी
७३. डोंगरावरुन सतत पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह
७५. अंकुर
७६. आमिरचा क्रिकेटपट
७७. गंगेची भगिनी (हिंदी)
७८. वशिला

### उभे शब्द

१. अर्धवर्तुळाकार
२. बगळा
३. भित्रा
४. अभिनेता
५. भेग
६. तप:सामर्थ्य
७. निमग्न, गुंग
८. हुशार, चाणाक्ष
९. मेणा
१०. रेषा
१४. शंकराला वाहण्याचे त्रिदल
१६. पूर्ण तापलेले, बहरातील
१७. एकत्र जेवण, --- पंगत
१८. रथातील प्रवासी
२०. पुकारा, हाळी
२१. बारा वर्षांचा काळ
२३. घंटेचा आवाज
२६. नाश पावणे
२८. नदीचा पाट
३१. सुखद थंडी
३२. कुबड
३३. एकंदरीने निवड न करता
३४. पाणकोंबडा
३६. नेहमी
३८. चूकच्या विरुद्ध
३९. पैशाला फुटणारा कोंब?
४०. फाजील उत्साह
४२. गरज
४४. कारस्थान
४६. झाडाला फुटलेली नवीन पाने
४७. नम्र, वाकलेला
४८. काळोख,४९. उंदराची चाहूल
५१. लायब्रीला मराठी शब्द
५२. पाणी
५५. मुळाक्षरे,५६. सिद्ध
५७. गवत काढण्याचे हत्यार
६०. पुरेसा भक्कम
६२. देवलोकीचे गायक-वादक
६३. छोटी ताटली
६४. कवी
६६. धूर्त, लबाड
६८. प्रश्न
७१. सूरतालापासून भरकटलेले
७३. द्रव्य
७४. शुकसखी

### आडवे उत्तरे

१.घुबड ४.अफरातफर ९.पाखरे ११.मकर १२.दाट १३.तबेला १५.पोरका १७.अंबर १९.लखलखीत २२.काटकसर २४.गलथान २५.पर २७.रण २८.कात २९.अंगिकार ३०.शीतल ३१.गाढव ३२.पोत ३३.सरबत ३५.वासर ३७.सांब ३९.मोकळा ४१.दावानल ४३.रोकड ४५.सटकपावली ४८.आंबट ४९.खुजा ५०.नवार ५२.आधार ५३.उडणे ५४.टवटवीत ५७.कोपर ५८.गो ५९.यातनामय ६१.गंडकी ६३.तमासगीर ६५.तारकाबल ६७.बला ६८.सय ६९.वेळ ७०.सबेरा ७२.सुकामेवा ७३.धबधबा ७५.डीर ७६.लगान ७७.जमुना ७८.लग्गा

### उभे उत्तरे

१.घुमटाकार २.बक ३.डर ४.अदाकार ५.फट ६.तपोबल ७.रत ८.चलाख ९.पालखी १०.रेघ १४.बेल १६.रसरशीत १७.अंगत १८.रथारुढ २०.ललकारी २१.तप २३.टणत्कार २६.रसातळाला खाणे २८.कालवा ३१.गारवा ३२.पोक ३३.सरसरकट ३४.बदक ३६.सदा ३८.बरोबर ३९.मोड ४०.चेव ४२.नड ४४.कट ४६.पालवी ४७.लीन ४८.आंधार ४९.खुडबूड ५१.वाचनालय ५२.आप ५५.वर्णमाला ५६.तयार ५७.कोयता ६०.सबळ ६२.कीन्नर ६३.तबकडी ६४.गीतकार ६६.कावेबाज ६८.सवाल ७१.बेताल ७३.धन ७४.मैना



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त




### वानखेडेवर हेटमायरचे वादळ, २५० च्या स्ट्राईक रेटने झिम्बाब्वेची धुळधाण

**मुंबई**–टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ सामन्यामध्ये वेस्ट इंडिजच्या शिमरन हेटमायरने झिम्बाब्वेविरुद्ध वादळी खेळी केली आहे. या सामन्यात झिम्बाब्वेने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला, त्यानंतर त्यांनी वेस्ट इंडिजचा ओपनर ब्रॅन्डन किंग याला ९ रनवरच आऊट केलं, पण किंगची विकेट गेल्यानंतर हेटमायर झिम्बाब्वेच्या बॉलिंगवर तुटून पडला. हेटमायरने ३४ बॉलमध्ये २५० च्या स्ट्राईक रेटने ८५ रनची वादळी खेळी केली. हेटमायरच्या या खेळीमध्ये ७ फोर आणि ७ सिक्सचा समावेश होता. शिमरन हेटमायरने त्याच्या इनिंगमधली एक सिक्स तब्बल १०८ मीटर लांब मारली. १९ बॉलमध्येच हेटमायरने त्याचं अर्धशतक पूर्ण केलं. टी–२० वर्ल्ड कपच्या इतिहासातली वेस्ट इंडिजच्या खेळाडूचं हे सगळ्यात जलद अर्धशतक होतं.

### झिम्बाब्वेच्या चाहत्यांकडून आर्थिक मदतीची हाक

**मुंबई**–स्टेडियममध्ये आमच्या चाहत्यांची संख्या भलेही मोठी नसेल, पण सर्वाधिक आवाज त्यांचाच असतो. त्यांचा पाठिंबा आमच्यासाठी बहुमूल्य ठरत असल्याचे झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा काही दिवसांपूर्वीच म्हणाला होता. मात्र, झिम्बाब्वे संघाला मिळणारा पाठिंबा आता मअव्वल आठफफेरीत आणखीच कमी होण्याचा धोका आहे.ट्वेन्टी–२० विश्वचषकात झिम्बाब्वेचे चारही साखळी सामने श्रीलंकेत झाले. साखळीत झिम्बाब्वेसमोर ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेसारख्या बलाढ्य संघांचे आव्हान होते. त्यामुळे आपला संघ बाद फेरी गाठेल असे झिम्बाब्वेच्या चाहत्यांना वाटले नव्हते. त्यांनी केवळ श्रीलंकेपुरताच विचार केला होता. परंतु झिम्बाब्वेच्या संघाने अनपेक्षित कामगिरी करताना मअव्वल आठफफ ेरीही गाठली. त्यामुळे त्यांचे चाहते अडचणीत सापडले असून त्यांनी विश्वचषकाच्या पुढील टप्प्यातील सामन्यांसाठी प्रवास किंवा राहण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

### सलग चार सामन्यात अपयश, कोणाला वगळणार? झिम्बाब्वे विरुद्ध कोणाला संधी?

**मुंबई**–भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा टी २० वर्ल्ड कप २०२६ च्या चार सामन्यांमध्ये अपयशी ठरला आहे. सलग तीन सामन्यात खातं उघडू न शकलेला अभिषेक शर्मा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १५ धावा करुन बाद झाला. सलग चार सामन्यांमध्ये अपयशी ठरलेल्या अभिषेक शर्माला टीम मॅनेजमेंट झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात संघाबाहेर ठेवणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे. अभिषेक शर्माला संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय झाल्यास टीम मॅनेजमेंट कोणाला संधी देऊ शकते जाणून घेऊयात.

अभिषेक शर्मा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध महत्त्वाच्या सामन्यात सुपर ८ मधील पहिल्या लढतीत १५ धावा करून बाद झाला. यानंतर सलामीवीर म्हणून भारतीय क्रिकेट संघ व्यवस्थापनानं अभिषेक शर्माला बाहेर ठेवत संजू सॅमनसला संधी द्यावी, अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. भारताचा सुपर ८ मधील पुढचा सामना झिम्बाब्वे विरुद्ध २६ फेब्रुवारीला होणार आहे. उपांत्य फेरीत पोहोचायचं असल्यास भारताला पुढील झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज विरुद्धचे

# वेस्ट इंडिजचा झिम्बाब्वेवर १०७ धावांनी प्रचंड विजय

## वेस्ट इंडिजने तडाखेबंद फटकेबाजी करत झिम्बाब्वेविरुद्ध प्रचंड विजय मिळवला

वेस्ट इंडिजच्या संघाने चौकार, षटकारांची ताकद दाखवून देत वानखेडे स्टेडियमवर झिम्बाब्वेवर प्रचंड असा विजय मिळवला. वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करताना २५४ धावांचा डोंगर उभारला. झिम्बाब्वेचा डाव १४७ धावांतच संपुष्टात आला. यंदाच्या टी२० वर्ल्डकपमधली ही सर्वोत्तम धावसंख्या आहे तर टी२० वर्ल्डकपच्या इतिहासातली ही दुसऱ्या क्रमांकाची धावसंख्या आहे. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी ही धावसंख्या उभारताना १९ षटकार आणि १७ चौकारांची आतषबाजी केली. वेस्ट इंडिजने ब्रँडन किंग आणि शे होप या सलामीवीरांना झटपट गमावलं पण यानंतर शिमोरन हेटमायरने ३४ चेंडूत ७ चौकार आणि ७ षटकारांसह ८५ धावांची वादळी खेळी साकारली. १०वर असताना मुझाराबानीच्या गोलंदाजीवर मुसेकिव्हाने हेटमायरचा झेल सोडला. तो झिम्बाब्वेला चांगलाच महागात पडला. ७०वर असताना मुसेकिव्हाने इव्हान्सच्या गोलंदाजीवर पुन्हा एकदा झेल सोडला.या जीवदानांचा फायदा उठवत हेटमायरने वानखेडेवर जमलेल्या चाहच्यांना चौकार, षटकारांची पर्वणी सादर केली. त्याला रोव्हमन पॉवेलची चांगली



### १९ षटकार, १७ चौकारांची आतषबाजी

साथ मिळाली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ५२ चेंडूत १२२ धावांची भागीदारी केली. पॉवेलने ४ चौकार आणि ४ षटकारांसह ३५ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. हे दोघे बाद झाल्यानंतरही वेस्ट इंडिजची फटकेबाजी सुरुच राहिली. शेरफन रुदरफोर्डने १३ चेंडूत नाबाद ३१ धावांची खेळी केली. त्याने ३ चौकार आणि २ षटकार लगावले. रोमारिओ शेफर्डने १० चेंडूत ३ षटकारांसह २१ धावा केल्या. जेसन होल्डरने ४ चेंडूत १३ धावा केल्या. झिम्बाब्वेतर्फे रिचर्ड गरावा आणि ब्लेसिंग मुझाराबानी यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

प्रचंड लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात डळमळीत झाली. मारुमानीला फोर्डने बाद केलं. यंदा स्पर्धेत उत्तम फॉर्मात असलेल्या ब्रायन बेनेटला अकेल होसेनने बाद केलं. रायन बर्ल भोपळाही फोडू शकला नाही. डिऑन मेयर्सने १५ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह २८ धावांची खेळी केली. गुदकेश मोटीने मेयर्सला बाद केलं. कर्णधार सिकंदर रझाने २७ धावा केल्या. गुदकेश मोटीने ४ षटकात २८ धावांच्या मोबदल्यात ४ विकेट्स घेतल्या. अकेल होसेनने ३ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. झिम्बाब्वेचा डाव १४७ धावांतच आटोपला. ब्रॅड इव्हान्सने ४३ धावांची खेळी केली.

प्रचंड फरकाने जिंकल्याने वेस्ट इंडिजचा नेट रनरेट अतिशय चांगला झाला आहे. सेमी फायनल प्रवेशाच्या दृष्टीने वेस्ट इंडिजसाठी हा दमदार विजय अतिशय उपयुक्त ठरणार आहे.

# भारतीय महिला संघाचा लय राखण्याचा प्रयत्न

ब्रिस्बेन : ट्वेन्टी–२० मालिकेमध्ये जेतेपद मिळिवल्यानंतर भारतीय महिला संघाचे लक्ष्य आज, मंगळवारपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणार्या एकदिवसीय सामन्यांतही आपली लय राखण्याचे असेल. भारताने गेल्या वर्षी नवी मुंबईत झालेल्या विश्वचषक उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाला नमविले होते. ही मालिकेतून अलिसा हिली ही एकदिवसीय प्रारूपातून निवृत्ती घेणार आहे. भाराताविरुद्ध सहा मार्चपासून पर्थ येथे होणारी कसोटी तिच्या कारकीर्दीतील अखेरचा सामना असेल. तीन सामन्यांच्या ट्वेन्टी–२० मालिकेतून बाहेर राहिल्यानंतर हीलीचे पुनरागमन झाले आहे.





**सामना चालू होण्याची वेळ : सकाळी ९.२० वा.**
**थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स ३, जिओहॉटस्टार ॲप.**

**महिला इंडिया वि. ऑस्ट्रेलिया ट्वेन्टी–२० नंतर आता वनडेची बारी! भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलियाला पुन्हा भिडणार**

**ट्वेन्टी–२० मालिकेतील ऐतिहासिक विजयानंतर भारतीय महिला संघ मंगळवारपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत आपली विजयी लय कायम राखण्यासाठी मैदानात उतरणार आहे.**

भारताने ट्वेन्टी–२० मालिका २–१ अशी जिंकली. गेल्या दशकातील कोणत्याही प्रारूपातील ऑस्ट्रेलियाविरुद्धचा हा भारताचा मोठा विजय आहे. लेग स्पिनर अलाना किंगने एकदिवसीय व कसोटी संघात पुनरागमन केले आहे. भारतासाठी काश्वी गौतम, हरलीन देओल आणि प्रतिका रावल संघात अरुंधती रेड्डी, भारती फुलमाळी आणि श्रेयांका पाटील यांच्या जागी आल्या आहेत.तारांकित फलंदाज स्मृती मनधानाने तिसर्या ट्वेन्टी–२० मध्ये ८२ धावांची खेळी केली होती. आपली हीच लय कायम राखण्याचा तिचा प्रयत्न असेल. जेमिमा रॉड्रिग्ज चांगल्या लयीत आहे. तिने तिसर्या ट्वेन्टी–२० मध्ये ५९ धावा केल्या.

गोलंदाजीत रेणुका सिंह ठाकूर आणि श्री चरणी यांनी चांगली कामगिरी केली. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियन संघात सामना जिंकवून देणार्या खेळाडूंची कमतरता नाही. ॲलिस पेरी, ॲश्ले गार्डनर, बेथ मूनी, तहलिया मॅकग्रा, हिली आणि किंग कोणत्याही स्थितीत कामगिरी करण्यात सक्षम आहेत.





### अभिषेक, तिलकपैकी एकाला वगळण्याचे प्रशिक्षकांचे संकेत

**अहमदाबाद :** ट्वेन्टी–२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत ‘अव्वल आठ’ फेरीच्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून दारुण पराभव पत्करावा लागल्यानंतर आता फलंदाज, फलंदाजीचा क्रम आणि डावखुया फलंदाजांचे नियोजन अशा सर्वच आघाड्यांवर संघ व्यवस्थापन फ ेरविचार करत असल्याची चर्चा आहे.

साहाय्यक प्रशिक्षक रायन टेन दोएशहाते आणि फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी तसे संकेतच दिले आहेत. तीन सामन्यांत अपयशी ठरलेल्या अभिषेक शर्मा, तिलक वर्मा यांच्यापैकी एकावर गच्छंतीची वेळ येऊ शकते. त्याच बरोबर रिंकू सिंहचेही स्थान धोक्यात येण्याची शक्यता असल्याचे समजते.

एका पराभवाने बसलेल्या जोरदार झटक्यानंतर संघात बदल तर अपेक्षित आहेत. मात्र, ते कसे आणि काय करायचे याबाबत संघ व्यवस्थापन विचार करत असल्याचे फलंदाजी प्रशिक्षक कोटक यांनी सांगितले. अर्थात, नियोजन आहे तेच ठेवावे की बदलावे यावर अजून व्यवस्थापनात एकमत नाही. आम्ही विचार करत असल्याचे कोटक यांनी स्पष्ट केले.

ङ्गतिथे सामना गमावला:ङ्ख, सूर्यकुमार यादवने कोणाच्या डोक्यावर फोडलं पराभवाचं खापर? पराभवानंतर नेमकं काय म्हणाला?

साहाय्यक प्रशिक्षक दोएशहाते यांनी मात्र थेट विधान करताना फलंदाजीतील अपयश लक्षात घेता ते भरून काढणारा एकही फलंदाज राखीव खेळाडूंत नाही याची कबुलीच दिली. आघाडीच्या फळीतील डावखुया फलंदाजांचे नियोजन देखील सुधारण्याची गरज आहे. यासाठी पुन्हा एकदा संजू सॅमसनचा विचार होऊ शकतो. सलामीला डाव्या–उजव्या हाताने फलंदाजी करणारी जोडी यशस्वी ठरू शकते असे दोएशहाते यांनी थेट सांगितले.भारताच्या फलंदाजीतील अपयशात सर्वाधिक चर्चा अभिषेक आणि तिलक यांच्याबाबतच होत आहे. विश्वचषक स्पर्धे दरम्यानच अभिषेकला अन्नातून विषबाधा झाल्याने पोटाच्या विकाराचा सामना करावा लागला. यामुळे त्याच्या क्षमतेवर खूप परिणाम झाला. लागोपाठ तीन वेळा शून्यावर बाद झाल्याने त्याच्यावर दडपण आले असावे, असे सांगून दोएशहाते यांनी उपलब्ध परिस्थितीत पर्याय शोधून काम करणे इतकेच आमच्या हाती असल्याचे स्पष्ट केले. ‘‘सातत्यपूर्ण अपयशानंतर संघात दोन दिवसांत बदल होऊ शकत नाहीत. अपयशावर काम करण्यासाठी किमान पंधरा दिवसांचा तरी कालावधी आवश्यक आहे. हा माझा प्रशिक्षण अनुभव आहे.

### हेटमायर आणि पॉवेलमुळे वेस्ट इंडिजने ओलांडला २५० धावांचा टप्पा

मुंबई–आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकप स्पर्धेतील सुपर ८ फ ेरीत वेस्ट इंडिज विरुद्ध झिम्बाब्वे हा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरू आहे. नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजने हेटमायर आणि पॉवेलच्या फटकेबाजीच्या जोरावर २५० धावांचा टप्पा ओलांडला. विंडीजने २० षटकांत सहा बाद २५४ धावा केल्या. शिमरॉन हेटमायरने ३४ चेंडूत ७ षटकार आणि ७ चौकार मारत ८५ तर रोवमन पॉवेलने ३५ चेंडूत ४ षटकार आणि ४ चौकार मारत ५९ धावा केल्या.वेस्ट इंडिजकडून ब्रँडन किंगने ९, शाई होपने १४, हेटमायरने ८५, पॉवेलने ५९, शेरफेन रदरफोर्डने नाबाद ३१, रोमारियो शेफर्डने २१, जेसन होल्डरने १३, मॅथ्यू फोर्डेने नाबाद १ धावांचे योगदान दिले. झिम्बाब्वेने २१ अवांतर चेंडू टाकले. विंडीजच्या फलंदाजांनी झिम्बाब्वेच्या सर्व गोलंदाजांची धुलाई केली. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुजराबानी आणि रिचर्ड नगारावाने प्रत्येकी २ तर ग्रॅमी क्रेमर आणि ब्रॅड इव्हान्सने प्रत्येकी १ विकेट घेतली.



इटलीतील टेसेरो येथे झालेल्या मिलान–कॉर्टिना २०२६ ऑलिंपिक हिवाळी खेळांमध्ये महिलांच्या क्रॉस–कंट्री स्कीइंग ५० किमी मास स्टार्ट क्लासिक सामन्यात सहभागी महिला खेळाडू.

## टी:२० २०२६

### डेव्हिड मिलरने भारताला पराभूत केल्यानंतर प्रेस कॉन्फरन्समध्ये मोठं गर्वाने वक्तव्य केले

# भारताला सहज पराभूत करता येऊ शकतं डेव्हिड मिलरचं विजयानंतर मोठं वक्तव्य

**अहमदाबाद:** दक्षिण आफ्रिकेने अहमदाबादमध्ये सुपर–८ सामन्यात भारतावर ७६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेने या सामन्यात म ानहानीकारक पराभव करत २०२४ टी–२० वर्ल्डकप फायनलमधील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. दक्षिण आफ्रिकेच्या या विजयाचा हिरो डेव्हिड मिलर ठरला, ज्याने ६३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. भाराताविरूद्धच्या विजयानंतर डेव्हिड मिलरने भारताला ङ्गपराभूत करता येण्यासारखा संघङ्ख असल्याचं स्पष्ट शब्दांत म्हटलं.

सामनावीर ठरलेल्या अनुभवी डेव्हिड मिलरने सांगितले की, अचूक अंमलबजावणी आणि आखलेल्या रणनितीवर ठाम राहिल्यामुळेच त्यांनी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील अपराजित भारतीय संघाला पराभूत केलं. मिलरच्या कमालीच्या फटकेबाजीनंतर द. आफ्रिकेच्या गोलंदाजांनी भारताच्या फलंदाजीला सुरूंग लावला आणि कोणताच फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. टी–२० विश्वचषक २०२६ मधील भारताची अपराजित मालिका या सामन्यात खंडित झाली.



फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत दक्षिण आफ्रिकेने शिस्तबद्ध आणि प्रभावी कामगिरी केली. मिलरची संयमित पण आक्रमक खेळी या ऐतिहासिक विजयाचा कणा ठरली. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत भारतासारख्या संघाविरुद्धच्या या मोठ्या विजयाचा अर्थ काय, असा प्रश्न मिलरला विचारण्यात आला.

भारताला पराभूत केल्यानंतर काय म्हणाला डेव्हिड मिलर?त्यावर मिलर म्हणाला, ङ्गभारत हा पराभूत करता येईल असा संघ आहे, हे दाखवून दिलं. ते अतिशय ताकदवान संघासह स्पर्धेत उतरतात, हे मी आधीही म्हटलं आहे. पण अशा स्पर्धेत आमच्यासाठी महत्त्वाचं म्हणजे साध्या गोष्टींवर लक्ष ठेवणं, प्रत्येक खेळाडूने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणं आणि दिलेलं काम पूर्ण करणं.तो पुढे म्हणाला, ङ्गआमचा संघ परिपक्व आहे. अनेक खेळाडूंनी एकत्रितपणे बराच काळ क्रिकेट खेळलं आहे आणि दबावाच्या क्षणी तो अनुभव उपयोगी पडतो. आपल्या भूमिकेत राहून कामगिरी करणं आणि नेहमी अधिक चांगलं करण्याची भूक ठेवणं, हेच आमचं बळ आहे.ङ्ख

हा पराभव भारतासाठी टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील धावांच्या फरकाने झालेल्या दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पराभव ठरला, तर टी–२० विश्वचषक इतिहासातील हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. सुपर–८ टप्प्याच्या सुरुवातीलाच बसलेला हा मोठा फटका भारतासाठी निश्चितच चिंतेचा विषय ठरला आहे.भारताला सेमीफायनल गाठण्यासाठी सुपर–८मधील पुढील दोन सामने झिम्बाब्वे व वेस्ट इंडिज यांच्याविरूद्ध खेळवले जाणार आहेत. जर संघाला सेमीफायनल गाठायची असेल तर या दोन्ही संघांना पराभूत करणं गरजेचं असेल. फक्त पराभव नाही तर टीम इंडियाला मोठ्या फरकाने विजय मिळवण्याची गरज आहे, जेणेकरून त्यांचा नेट रन रेट सुधारेल आणि इतर संघांच्या कामगिरीवरही अवलंबून राहावं लागणार आहे.

**दक्षिण आफ्रिकेसोबत हरल्यानंतर समिकरण बदलले**

भारताला सेमीफायनल गाठण्यासाठी सुपर–८मधील पुढील दोन सामने झिम्बाब्वे व वेस्ट इंडिज यांच्याविरूद्ध खेळवले जाणार आहेत. जर संघाला सेमीफायनल गाठायची असेल तर या दोन्ही संघांना पराभूत करणं गरजेचं असेल. फक्त पराभव नाही तर टीम इंडियाला मोठ्या फरकाने विजय मिळवण्याची गरज आहे, जेणेकरून त्यांचा नेट रन रेट सुधारेल आणि इतर संघांच्या कामगिरीवरही अवलंबून राहावं लागणार आहे.

## डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या कु.समृद्धी पाटोळेची अंतिम फेरीसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयाची विद्यार्थिनी कु.समृद्धी पाटोळे हिने डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर झालेल्या प्रात्यक्षिक परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत तिने पुढील फेरीसाठी पात्रता मिळवली आहे. या फेरीत प्रकल्प सादरीकरण व मुलाखत होणार असून त्यातून अंतिम निवड केली जाणार आहे. विज्ञान विषयातील अतिशय नामांकित व स्पर्धात्मक असलेल्या या परीक्षेत राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून फक्त सात टक्के विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड केली जाते, तर त्यामधून केवळ एक टक्के विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड होते. अशा कठीण परीक्षेत कु.समृद्धी पाटोळे हिने मिळवलेले यश हे अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, गणेश कदम, बाळाराम पिचारे, उपमुख्याध्यापिका अलका अंकुशे, मार्गदर्शक शिक्षक भगवंत कलेढले, अफसर शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यालय परिवाराला विश्वास आहे की, कु.समृद्धी पाटोळे ही प्रकल्प सादरीकरण व मुलाखतीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदकाची मानकरी ठरेल.

## दयानंद वाणिज्यमध्ये एनपीटीईएल सत्कार व जनजागृती कार्यक्रम उत्साहात

### ५६ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश; ४ राष्ट्रीय अव्वल, २ सुवर्णपदक, ५ रौप्यपदक विजेते; मार्गदर्शक प्राध्यापकांचाही सन्मान



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात प्रगत विद्यार्थी कक्षाच्या वतीने एनपीटीईएल परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व जनजागृती कार्यक्रम शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

एनपीटीईएलच्या प्रथम सत्रात एकूण ५६ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. यामध्ये ४ विद्यार्थी राष्ट्रीय अव्वल ठरले, २ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले, ५ विद्यार्थ्यांनी रौप्यपदक पटकाविले. तसेच १९ विद्यार्थ्यांना विशेष प्रावीण्य प्रमाणपत्र तर २६ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. पी. एम. मान्नीकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जे. एस. दरगड उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. जी. आर. लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण, बीसीए विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. स्वामी तसेच एनपीटीईएल समन्वयक डॉ. आकांक्षा भांजी यांची विशेष उपस्थिती लाभली.

दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सत्काराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. आकांक्षा भांजी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत एनपीटीईएलच्या प्रथम सत्राचा सविस्तर आढावा मांडला. प्रमुख पाहुणे डॉ. दरगड यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करत मुक्त ऑनलाईन अभ्यासक्रमांमुळे होणारे शैक्षणिक व व्यावसायिक फायदे स्पष्ट केले. भविष्यातील उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील संधींबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांचा लाभ घेत स्वतःमध्ये सातत्याने गुणात्मक भर घालावी व उज्ज्वल करिअर घडवावे, असे आवाहन केले. तसेच शैक्षणिक श्रेयांकन हस्तांतरणाबाबत माहिती देत संपूर्ण समितीचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनुजा कांबळे यांनी केले, तर प्रा. सुहाना शेख यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डी. जे. शेख, प्रा. डॉ. एल. एन. सोनी, डॉ. पी. एस. मुंदडा, डॉ. ए. ए. कांबळे, प्रा. पी. पी. पाटील यांचे विशेष योगदान लाभले. तसेच कार्यालयीन कर्मचारी माने व संदीप कांबळे यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# शिवमंदिरात हरिनामाचा गजर हीच सिद्धेश्वरांची लीला - हभप गुरुबाबा महाराज औसेकर

### सिद्धेश्वर मंदिरात चक्रीभजनाचा अलौकिक सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालयात वर्षानुवर्षे चक्रीभजन केले जाते.या माध्यमातून शिवमंदिरातही हरिनामाचा गजर होतो,हीच ईश्वराची खरी लीला आहे. चक्रीभजनाची ही परंपरा नाथ संस्थानकडून कधीही खंडित होणार नाही, असे प्रतिपादन सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले.

लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी चक्रीभजनाची सेवा अर्पण केली. यावेळी गुरुबाबा महाराज म्हणाले की,हरी आणि हर हे एकच आहेत. ईश्वराने द्वैतभाव निर्माण केलेला नाही.आपणही असा




भेद करणे चुकीचे आहे.असा भेद नसल्यामुळेच सिद्धेश्वरांच्या अर्थात शिवाच्या मंदिरात हरिचिंतन होत आहे.

भजनाच्या माध्यमातून आपण ईश्वराची आळवणी करतो.नवविधा भक्तीपैकी कुठल्याही मार्गाने ईश्वराची भक्ती करता येते.विशिष्ट देवांसाठी ठराविक भक्ती मार्ग नसतो.ज्या माध्यमातून तुम्हाला ईश्वर चिंतन करता येईल तो मार्ग स्वीकारावा, असे गुरुबाबा म्हणाले.

ईश्वर हे अंतिम सत्य आहे. निर्गुण, निराकार ईश्वराला ज्या रूपात आपण पाहू तसाच तो भासतो. त्याला एका विशिष्ट रूपामध्ये आपण बंदिस्त करू शकत नाही. त्यामुळे मनात कुठलाही द्वैतभाव न ठेवता भक्ती करावी. हीच भक्ती आपल्याला मोक्ष मार्गाला घेऊन जाऊ शकते.हरी आणि हरामध्ये भेद करण्याची पात्रता आपल्यात नाही.त्यामुळे मिळालेल्या मानवी जन्माचे कल्याण करण्यासाठी हरिचिंतन करा, असा उपदेश सद्गुरु गुरुबाबा महाराजांनी केला.

गुरुबाबा महाराजांचे चक्रीभजन हा अलौकिक सोहळा असतो.तो पाहण्यासाठी आणि भजनाचा लाभ घेण्यासाठी हजारो भक्तांनी यावर्षीही श्री सिद्धेश्वर मंदिरात गर्दी केली होती.यावेळी देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने प्रशासक सचिन जांबुतकर,ज्येष्ठ विश्वस्त विक्रमतात्या गोजमगुंडे,अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे, विजयकुमार धायगुडे महादेव बन,संतोष भालेराव व मान्यवरांनी गुरुबाबा महाराजांचा सत्कार केला.

## संत ज्ञानोबाराय श्री तुकोबाराय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

### कृषि प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा - माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या अखंड जयघोषात लातूर परिसरातील खंडापूर येथे सुरू असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सव निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह संत्संगात समितीच्या वतीने आयोजित संत ज्ञानोबाराय तुकोबाराय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उदघाटन सोमवारी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे ह भ प गुरुवर्य ज्ञानेश्वर महाराज कदम ह भ प महेश महाराज माकणीकर ह भ प किशोर महाराज शिवनीकर ह भ प रेड्डी महाराज ह भ प शाम बरूरे जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव



मोरे रेना साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव रेनाचे उपाध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख संभाजी सुळ बाळासाहेब कदम गुरुनाथ गवळी विकास देशमुख दयानंद बिडवे शंकरराव बोळंगे भैरवनाथ सूर्यवंशी सुपर्न जगताप शिवाजी कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते

प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

अखंड हरिनाम सप्ताहाचे निमित्ताने या परिसरात संयोजन समितीने राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरवले असून देश राज्यपातळीवरील विविध कंपन्यांचे स्टॉल,तसेच माहिती प्रदर्शनात ठेवण्यात आली आहे याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी यावेळी केले तसेच त्यांनी याप्रसंगी प्रदर्शनातील विविध कंपन्यांची ट्रॅक्टर, ट्रॉली,हार्वेस्टर शेतकऱ्यांना उपयुक्त लागणारी विविध स्टॉलची पाहणी केली सर्वांना शुभेछा दिल्या

## महाराष्ट्र महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त ऐतिहासिक वस्तू, नाणी व शस्त्रांचे प्रदर्शन

**निलंगा/प्रतिनिधी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त श्री. सौदागर बेवनाळे यांच्या श्री. चक्रधर स्वामी वस्तुसंग्रहालयातील ऐतिहासिक नाणी, वस्तू व शस्त्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री .विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे हस्ते करण्यात आले, याप्रसंगी त्यांनी प्रदर्शनासाठी मांडलेल्या नाणे वस्तू व शस्त्रास्त्रांची पाहणी करून या प्रदर्शनाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रशांत गायकवाड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनात दक्षिण भारतातील पहिले राजघराणे सातवाहन वंशातील राणी नागनिका यांच्या काळातील दुर्मिळ नाणी व त्यासोबतच उत्तर व दक्षिण भारतातील विविध राजघराण्यांची नाणी विशेषता छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवराई नाणी, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज कालीन नाण्यांसह पेशवे व ब्रिटिश कालीन नाणी या प्रदर्शनाचे आकर्षण होते.



यासोबतच मराठाकालीन शस्त्रांमध्ये तलवार, गुर्ज, कट्यार, विटा, भाला, ढाल, दगडी व धातुचे तोफगोळे इत्यादी शस्त्रे विद्यार्थ्यांना प्रदर्शनात पाहता आली.


शस्त्रांसोबतच लोखंडी कुलूप, धातुच्या वस्तू, सातवाहनकालीन दगडी रोमन धाटणीचे जाते, पाटा, वरवंटा इ. ऐतिहासिक वस्तू या प्रदर्शनाचे आकर्षण होते.

हे प्रदर्शन पाहण्यासाठी महाराष्ट्र शिक्षण समितीतील फार्मसी कॉलेज, महाराष्ट्र विद्यालय, महाराष्ट्र अध्यापक विद्यालय, महाराष्ट्र प्राथमिक विद्यालयाच्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ सुभाष बेंजलवार, प्रा. दत्तात्रय पवार, इतिहास विभागातील विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माईर एमआयटी शिक्षण संकुल, लातूर येथे त्रिदिवशीय प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा थाटात संपन्न

### श्री गणेश, श्री महालक्ष्मी व श्री हनुमान मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठापना

**लातूर/प्रतिनिधी :** माईर एमआयटी शिक्षण संकुल, लातूर येथील विश्वमैदान परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या श्री गणेश, श्री महालक्ष्मी व श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची विधिवत व शास्त्रोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा दि. २० ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात श्री महालक्ष्मी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सौ. पुनमताई आबासाहेब नागरगोजे यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच श्री गणेश व श्री हनुमान मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना डॉ. सुरेश कांगणे व डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते पार पडली. श्री गणेश व श्री हनुमान मंदिरांचे कलशारोहण ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर व किसन महाराज पवार यांच्या हस्ते, तर श्री महालक्ष्मी मंदिराचे कलशारोहण





ह.भ.प. अर्जुन महाराज लाड आणि कु. युगंधरा सौरभ कराड व इतर कुमारिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे आभासी माध्यमातून उपस्थित होते. तसेच विश्वशांती दिंडी प्रमुख सौ. उषाकाकु विश्वनाथ कराड, माईर एमआयटी शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी श्री काशिराम दा. कराड, सौ. कौसल्या काशीराम कराड, माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक श्री राजेश कराड, संचालक श्री अनिल कराड, सौ. हेमांगी हनुमंत कराड, सौ. संजिवनी रमेशअप्पा कराड, सौ. आशा अनिल कराड आदी मान्यवरांची उपस्थिती होती. त्रिदिवशीय सोहळ्याची सुरुवात दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी विणापूजन व मिरवणुकीने झाली. त्यानंतर श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापना, जलाधिवास, नवग्रह स्थापना, हवन व शय्याधिवास असे विविध धार्मिक विधी पार पडले. दि. २१ फेब्रुवारी रोजी प्रासाद वास्तु, कुटीर होम, मुख्य देवता हवन, स्नपनविधी व धान्याधिवास आदी विधी पार पडले. तर दि. २२ फेब्रुवारी रोजी प्रातःपूजन, मूर्ती स्थापना, कलशारोहण, उत्तरांग हवन व बलिदान विधी संपन्न झाले. महापूर्णाहुती, महानैवेद्य व महाआरतीने या भव्य सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. या संपूर्ण विधीचे पौरोहित्य वे.शा. संपन्न श्री रामकृष्ण कुलकर्णी गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. तीन दिवशीय सोहळ्याचे सूत्रसंचालन परमेश्वर सोनवणे यांनी केले. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्याला माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहातील पदाधिकारी, प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, भाविक-भक्त व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## होळी सणाच्या निमित्ताने रेल्वे एसएमव्हीटी बेंगळुरू-बीदर आणि बेंगळुरू कॅन्टोन्मेंट-कलबुरगि विशेष गाड्यांच्या सेवा सुरू ठेवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे एसएमव्हीटी बेंगळुरू-बीदर आणि बेंगळुरू कॅन्टोन्मेंट-कलबुरगि विशेष गाड्यांच्या सेवा सुरू ठेवणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

एसएमव्हीटी बेंगळुरू-बीदर द्वि-साप्ताहिक विशेष (१८ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०६५३९ एसएमव्हीटी बेंगळुरू - बिदर द्वि-साप्ताहिक विशेष २७.०२.२०२६ पर्यंत धावण्यासाठी सूचित केले होती, आता ती दर शुक्रवार आणि रविवारी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. (९ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०६५४० बीदर - एसएमव्हीटी बेंगळुरू द्वि-साप्ताहिक विशेष २८.०२.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता ती दर शनिवार आणि सोमवारी ३०.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. (९ फेऱ्या)



बेंगळुरू कॅन्टोन्मेंट - कलबुरगि साप्ताहिक विशेष (८ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०६२०७ बेंगळुरू कॅन्टोन्मेंट - कलबुरगि विशेष २८.०२.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता दर शनिवारी २८.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. (४ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०६२०८ कलबुरगि - बेंगळुरू कॅन्टोन्मेंट विशेष ०१.०३.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता दर रविवारी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. (४ फेऱ्या)

वरील गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष गाड्यांच्या सततच्या प्रवासासाठी विशेष शुल्क आकारून आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. अनावश्यक डब्यांसाठी आरक्षण स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि ठरळश्रजपश ॲपद्वारे देखील करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती केली जाते. या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne ॲप किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# नळेगावात शिवजयंतीनिमित्त २५२ जणांचे विक्रमी रक्तदान

## अनिल चव्हाण यांचे ६९ वे रक्तदान

**नळेगाव/अजगर मजकुरी :** नळेगाव येथे शिवजयंती निमित्त अनिल चव्हाण मित्र मंडळ व सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या २७ वर्षापासून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.या शिबिरात विक्रमी २५२ जणांनी रक्तदान करून शिवजयंती साजरी केली.

जिल्ह्यात सर्वात मोठे रक्तदान शिबिर नळेगाव येथे साजरे केले जाते.जिल्ह्यात नळेगाव ची ओळख ही रक्तदात्याचे गाव म्हणून ओळखू लागले आहेत. शिबिराचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.यावेळी पोलिस निरीक्षक बालाजी भंडे , सरपंच सूर्यकांत चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक शोकात बेग,पोलीस जमादार सिद्धेश्वर जाधव, लातूर जिल्हा काँग्रेस सेवादल जिल्हा अध्यक्ष अनिल चव्हाण, वि.का.सो. माजी चेअरमन दयानंद मानखेडे, सूर्यकांत सावंत, सुभाष शेलार, डिगंबर बिराजदार, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष उमाकांत सावंत, दगडु सावळकर, सतीश पांडे, अश्फाक मुजावर, राम किशन शिरुरे, शिवजागृतीचे अध्यक्ष बब्रुवान जाधव,सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तुकाराम बिराजदार, तलाठी प्रशांत तेरकर, व्यंकटी फरकांडे,शिवसेना नेते शंकर शेलार, अमजद घोरवाडे, मोहन रेड्डी, गोकुळ पारवे, सुनील भोसले, पत्रकार संजय कांबळे, मुक्तार मुजावर, राजेंद्र सावंत,बालाजी सावंत, सुनील चव्हाण, राष्ट्रवादीचे गणेश शिंदाळकर, संजय शृंगारे,जनार्धन शृंगारे, विजय शृंगारे, गणेश शृंगारे, पांडुरंग नळेगावकर, माजी ग्राम पंचायत सदस्य जनार्धन सावंत, आझर भाई खुरेशी, दाऊद बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.या शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याचा प्रत्येकी अडीच लाख रुपयांचा वैयक्तिक अपघात जोखीम विमा पॉलिसी काढण्यात आली. यासाठी बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटी नळेगाव,मा श्री उमाकांत सावंत मित्र मंडळ,




आडत व्यापारी असोसिएशन मार्केट कमिटी , जय महाराष्ट्र क्रिकेट क्लब,जीप व टेम्पो चालक मालक संघटना ,संभाजी सेना नळेगाव यांचे सौजन्य लाभले . या शिबिर यशस्वीतेसाठी कैलास चव्हाण, ऋषी बिराजदार पाटील, आदित्य सावंत, राजू शेलार, महेश बिराजदार, संतोष तेलंगे,बालाजी शेलार, गणपती धविले, पिंटू खांडेकर, अनिल पांचाळ, बाळासाहेब बरचे, भद्रीनाथ सोनटक्के, महेश इरलेवाड,भिवाजी गव्हाणे, अमोल सोमवंशी,शुभम अष्टेकर, अमीर खुरेशी, विजय ढोबळे पाटील, वेकंट माचवे, नवनाथ मानखेडे,अमोल पांचाळ,मोबिन गाडीवान,दीपक जाधव, आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन शैलेश रेड्डी यांनी केले तर आभार अनिल चव्हाण यांनी मानले.

# राष्ट्रसंत गाडगे बाबांचे आध्यात्मिक अर्थशास्त्र सामाजिक समतेचा आधार

## र:अ. भा. परिट-धोबी समाज संघटनेच्या कार्यक्रमात प्रा. सुधीर जाधव यांचे विचार

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रसंत गाडगे बाबांचे आध्यात्मिक अर्थशास्त्र हे केवळ प्रवचन नसून सामाजिक समतेचा आणि मानवी कल्याणाचा मुख्य आधार होते, असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्रा. सुधीरराव जाधव यांनी केले. अ. भा. परिट-धोबी समाज संघटनेच्या वतीने संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज उद्यानात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गणपतराव तेलंगे यांनी भूषविले, तर साहित्यिक प्रा. रामाकिशन समुखराव व सेवानिवृत्त बीडीओ डी. व्ही. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. व्याख्यानापूर्वी मान्यवरांच्या हस्ते सार्वजनिक उद्यानाची स्वच्छता करून गाडगे बाबांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

प्रा. जाधव पुढे म्हणाले की, गाडगे बाबांनी स्वच्छतेच्या माध्यमातून आरोग्याचे महत्त्व पटवून दिलेच, पण बचत आणि शिक्षणाची गरज जनमानसात ठामपणे बिंबवली. आज जागतिक आरोग्य संघटना ज्या विषयांवर काम करत आहे, त्याचे बीज गाडगे बाबांच्या कार्यात शतकापूर्वीच पेरले गेले होते. मारोतराव सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले, तर संजय व्यवहारे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुजबी साधनांतील आर्थिक महासत्ता' सर्वांसाठीच प्रेरणादायी हातात एक फुके गाडगे, एक काठी आणि अंगावर ठिगळांचे वस्त्र असूनही गाडगे बाबांनी विचारांची मोठी संपत्ती समाजाला दिली. एका बाजूला आधुनिक जग भौतिक सुखाच्या मागे धावत असताना, बाबांच्या साध्या राहणीतील आर्थिक तत्त्वज्ञानाने सर्वांना अस्वस्थ केले आहे. आज विद्यापीठ स्तरावर त्यांच्या या आर्थिक वैभवाचा' संशोधनात्मक अभ्यास होणे, ही त्यांच्या कार्याच्या महानतेची आणि भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे.

कार्याचा वारसा जपणे हीच खरी आदरांजली गाडगे बाबांनी स्वच्छतेच्या माध्यमातून केवळ परिसर नव्हे, तर समाज मन शुद्ध केले. त्यांनी दिलेली बचत आणि शिक्षणाची दीक्षा आज जागतिक स्तरावर आरोग्य संघटना राबवत आहेत. त्यांच्या कार्याचा वारसा जपणे हीच खरी आदरांजली ठरेल. प्रा. सुधीर जाधव, (राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर) गाडगे बाबांकडे वैचारिक संपन्नता अफाट गाडगे बाबांकडे भौतिक साधनसंपत्ती नसली तरी वैचारिक संपन्नता अफाट होती. त्यांचे साधेपण आजच्या पिढीला अस्वस्थ करते. अशा महान संताच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास विद्यापीठात होणे, हे त्यांच्या संपन्न वैभवाचे प्रतीक आहे. त्यामुळेच आज आपण त्यांचे स्मरण करतो. प्रा. रामकिशन समुखराव, (साहित्यिक)

# छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवजयंती निमित्त अन्नसेवा वाटप उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** शिवजयंती निमित्त लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अन्नसेवा वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन शुभम भैय्या मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते.




या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष शुभम भैय्या तळेकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक मान्यवर आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात नगरसेवक ऋषीं राजे यांच्यासह कृष्णा क्षीरसागर, अमोल डोके, मुकेश उटगे, निखिल वाघमारे, गणेश हेरकर, अक्षय कुरकुटे, योगेश टेंकाळे, गणेश आळंदकर, अनिल बासटवार, सुशील वेळापुरे, अभिषेक हांडे, हिमांशू बागल, राहुल पाटील, ओम बेवनाळे, राहुल सगरे, प्रतीक स्वामी, आशिष मस्के, आकाश बिडवे, सिद्धार्थ लामतुरे, प्रदीप करवंजे, शुभम गायकवाड, ॲड. आकाश कदम, प्रदीप राठोड, अमोल जाधव, महादेव कांदे, ओम गडदे, माधव योगी, ओमकार इंगवे, अथर्व गंगवार, प्रसाद बोयने, विक्रांत पाटील, राम घायाळ, सत्यप्रकाश आंबेकर, गोपाळ शिंदे, ज्ञानराज जाधव, भगवान, गोविंद, सुरज तळेकर, गोपाळ मरकड, विजय जाधव, आकाश बामणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान नागरिकांना अन्नसेवा वाटप करण्यात आली. शिवरायांच्या आदर्शांचे स्मरण करून सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे अभिनंदन केले. शिवजयंती निमित्त आयोजित या अन्नसेवा कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि एकतेचे वातावरण निर्माण झाले होते.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.
latursamachar.
com

## वरदहस्त ..

कसे घाले पाठीशी
कुणाचा वरद हस्त
असूनि सगळे स्पष्ट
कारवाई होई सुस्त

कुणा कळण्यापूर्वी
मलिदा केला फस्त
चिरकूटजरा पकडे
मुक्त होती मदमस्त

कसा बसवी वचक
शांतघालणारे गस्त
खोलवरमुरते पाणी
कुठवर पुरवे किस्त

आळा घाली गुन्ह्यां
कुणावरखरी भिस्त
सवाल विचारे सारे
कशीराखालं शिस्त

पुरावे अजून कुठले
मिळाले असूनदस्त
कुठेहरवली संहिता
काय आहे हो रास्त

बोटे रोखले ज्यावर
छान ठेवा बडदास्त
करुन सरुन चोरही
फिरतात बिनधास्त

जनरेटा असा असो
चुकाहोतील दुरूस्त
वचक वेळेवर बसो
जनता होई आश्वस्त

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# देवणीत दुकानाला आग; लाखोंचे साहित्य खाक: अग्निशामक दलाच्या तत्परतेने नुकसान टळले

**देवणी/प्रतिनिधी :** देवणी शहरातील लासोना चौकातील आप्पाजी कॉम्प्लेक्समधील दुकान क्रमांक १७ ला सोमवारी (दि. २३) रात्री १:३० वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. या भीषण आगीत दुकानातील टेबल, खुर्च्या, काउंटर आणि इलेक्ट्रॉनिक साहित्यासह लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने, अग्निशामक दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

आगीची माहिती मिळताच देवणी नगरपंचायतीच्या अग्निशामक दलाची गाडी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. नाजीम मोमीन, मुनाफ शेख, जाहेद उंटवाले, ताजोद्दीन बुदलेघर आणि इम्रान मोमीन यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने अथक परिश्रमानंतर एका तासात आग आटोक्यात आणली.

दुकानदार मारोती टेकाळे व शोभा टेकाळे यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन आर्थिक मदतीची मागणी केली आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने मदत करावी, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. महसूल अधिकारी लक्ष्मण कांबळे यांनी घटनेचा पंचनामा केला असून, देवणी पोलीस ठाण्यात याप्रकरणी नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

मदतीची मागणी आगीच्या घटनेनंतर नुकसानग्रस्त दुकानदार मारोती बाबुराव टेकाळे यांनी महसूल प्रशासनाकडे धाव घेतली आहे. ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण कांबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन रीतसर पंचनामा केला आहे. दुकानातील संपूर्ण फर्निचर आणि महागडे इलेक्ट्रॉनिक साहित्य जळाल्याने कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाकडून तात्काळ आर्थिक सहकार्य मिळावे, अशी आर्त हाक टेकाळे कुटुंबाने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# लातुरात वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचे थाटात उद्घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचे उद्घाटन लातूरच्या नूतन महापौर सौ. जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक लोकसंस्कृतीचा वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून १०० हुन अधिक लोक कलावंत जागरण, गोंधळ, करपल्लवी , पोतराज, वासुदेव, किर्तन यासारखे अनेक कलाविष्कार सादर करणार आहेत. राज्याच्या या सांस्कृतिक वारशाची ओळख सर्वांना व्हावी, ही ललोक कला समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने सदर उपक्रम राबविण्यात येत आहे.

लातूरच्या दयानंद सभागृहात हा महोत्सव साजरा होत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन महापौर सौ. जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक संचालनालयाचे छत्रपती संभाजीनगरचे अधिकारी सचिन पाईकराव, अश्विनी धायगुडे, नारायण डोंगरे महाराज यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना महापौर सौ. जयश्रीताई कांबळे यांनी महोत्सवाच्या निमित्ताने लातूर शहरात आलेल्या सर्व लोक कलावंतांचे आपण स्वागत करतो असे सांगितले. या कला महोत्सवाच्या आयोजनाने तरुण पिढीलाही आपली लोक कला जवळून पाहता, अभ्यासता येणार आहे. खऱ्या अर्थाने सांस्कृतिक संवर्धनाचाच हा महोत्सव असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. अश्विनी धायगुडे यांनी यावेळी बोलताना या कार्यक्रमामुळे आपल्या लोक कला प्रकारांना नवा उजाळा मिळणार असल्याचे सांगून या उपक्रमाबद्दल त्यांनी शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाप्रती आभार प्रकट केले. कार्यक्रमाची सुरुवात शिरड शहापूरच्या नारायण डोंगरे महाराज आणि चमूच्या सुंदर अशा जागरण गोंधळाने झाली. यावेळी अनेक कलाकारांनी आपल्या कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भास्कर पाईकराव यांनी केले.

## टी.सी. हरवली आहे

सोपान नामदेव मोरमपल्ले या नावाची चौथी पासची टी.सी. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिप्पलगाव ता.शिरूर अनंतपाळ जि.लातूर ची हिप्पलगाव ते लातूर प्रवास करत असताना हरवली आहे.कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.
संपर्क मो न.७०३०१४३१३०

## NAME OF CHANGE DECLARATION

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : MALAKJI IRFAN MOHAMMMED AKBAR. TO IRFAN AKBAR MALAKJI
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the IRFAN AKBAR MALAKJI will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- MALAKJI IRFAN MOHAMMED AKBAR.
NEW NAME:- IRFAN AKBAR MALAKJI.
Address :- KILLA GALLI, UDGIR.
TQ.UDGIR.DIST.LATUR -413517
AADHAR NO.- 744890796708
Mob. No.-9823621938

## NAME OF CHANGE DECLARATION

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : AYESHA SIDDIQA. TO AYESHA IRFAN MALAKJI
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the AYESHA IRFAN MALAKJI will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- AYESHA SIDDIQA.
NEW NAME:- AYESHA IRFAN MALAKJI.
Address :- KILLA GALLI, UDGIR.
TQ.UDGIR.DIST.LATUR -413517
AADHAR NO.- 744890796708
Mob. No.-9823621938

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६